cmyk

## संपादकीय

### बंडखोरीचा उत्सव की लोकशाहीचा अंत?

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले पक्षफोडीचे राजकारण आता एका नव्या टप्प्यावर पोहोचले आहे. शिवसेना पक्षात २०२२ मध्ये झालेल्या अभूतपूर्व बंडानंतर राज्याच्या राजकीय इतिहासात एक नवा अध्याय लिहिला गेला होता. त्यावेळी चाळीस आमदारांच्या बंडामुळे केवळ सरकारच बदलले नाही, तर महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचेही स्वरूप बदलले. आता त्याच कथानकाची पुनरावृत्ती खासदारांच्या पातळीवर होताना दिसत आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-८९ | शुक्रवार दि.१९ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### वाळू उपशावरून फॉर्च्युनर पेटवली,तिघांचा मृत्यू

छत्तीसगड:वाळू उपशावरून दीर्घकाळापासून सुरू असलेल्या वादाने छत्तीसगडच्या कोरिया जिल्ह्यात भयानक हत्याकांडाचे रूप घेतले. फॉर्च्युनर कारट्रक्समध्ये अडकवून, त्यावर पेट्रोल ओतून ती पेटवून देण्यात आली. तिघांचा होरपळून मृत्यू झाला असून, मृतांमध्ये भाजप नेते भारत सिंह यांचाही समावेश आहे. पीडित कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, भारत सिंह वाळू उपशाशी संबंधित वादात तडजोड करण्यासाठी गेले होते. मात्र, त्यांच्यासाठी आधीच रचलेल्या सापळ्यात ते अडकले. दरम्यान, मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी या घटनेची गंभीर दखल घेत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी अक्षत त्रिपाठी, विशाल त्रिपाठी, सत्यप्रकाश त्रिपाठी आणि मन्नू त्रिपाठी या चार आरोपींना अटक केली आहे, तर इतरांचा शोध सुरू आहे. याप्रकरणी नऊ आरोपींविरुद्ध खून आणि खुनाचा प्रयत्न यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण कोरिया जिल्ह्यात खळबळ उडाली असून परिसरात तणावाचे वातावरण आहे. खबरदारी म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### त्रि-भाषा सूत्राला अंतरिम स्थगिती देण्यास नकार

दिल्ली: केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नवीन त्रि-भाषा सूत्राच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि. १८) फेटाळली असून, कोणताही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे. हे नवीन शैक्षणिक धोरण शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू केले जाणार आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने हे प्रकरण यापूर्वीच प्रलंबित असलेल्या अशाच इतर याचिकांसोबत जोडले आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, या विषयावर यापूर्वीच सविस्तर चर्चा झाली आहे, त्यामुळे सध्यातरी कोणत्याही प्रकारची अंतरिम स्थगिती किंवा संरक्षणात्मक आदेश दिला जाऊ शकत नाही.

### तुपकरांच्या अन्नत्याग आंदोलनाचा चौथा दिवस

बुलढाणा: शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी आणि विविध कृषी प्रश्नांवर तोडगा काढण्याच्या मागणीसाठी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा गुरूवारी चौथा दिवस होता. सलग चार दिवसांपासून अन्नत्याग केल्यामुळे तुपकर यांची प्रकृती चिंताजनक बनली असून, वैद्यकीय तपासणीत त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची माहिती समोर आली आहे. वैद्यकीय पथकाकडून करण्यात आलेल्या तपासणीत तुपकर यांचा रक्तदाब आणि शरीरातील इतर महत्त्वाच्या घटकांमध्ये असंतुलन आढळून आले आहे. त्यामुळे प्रशासन आणि त्यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१८ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७४.०० क्विंटल | २,२५२ | २,४४१ | २,३४५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९१.५० क्विंटल | १,७०० | ४,४०० | २,७१० |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ९.५० क्विंटल | ७,४१५ | ७,४१५ | ७,४१५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ६४.५० क्विंटल | २,००० | २,७९१ | २,४८९ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १३.५० क्विंटल | ५,२६० | ५,५९० | ५,४२० |

# कर्जमुक्ती योजनेसाठी नवी यंत्रणा!

## शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार सक्रिय; अंमलबजावणीवर भर

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ची प्रभावी, पारदर्शक आणि सर्वसमावेशक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक बदल करणे, लाभार्थी शेतकरी वंचित राहू नयेत याची खबरदारी घेणे आणि बँकांमार्फत नव्याने पीक कर्ज वितरण सुलभ करणे या उद्देशाने राज्य सरकारने तीन स्वतंत्र समित्या गठित केल्या आहेत.**



सहकार, पणन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला असून, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्यासह अपर मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (सहकार), सचिव (कृषी), सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचा या समितीत समावेश आहे. ही समिती योजनेच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणार असून आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल सुचविणार आहे. दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या २ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर करण्यात आली आहे. योजनेचा आढावा घेण्यासाठी आणि आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच महसूल, वैद्यकीय ◀◀ पान २ वर

# खासदारांचे विलिनीकरण दोन दिवस लांबले !

## संसदेकडून घोषणा झाल्यानंतरच खासदार मुंबईत, चार खासदार राजस्थानी मुक्कामी



मुंबई । प्रतिनिधी

**शिंदेंचे ऑपरेशन टायगर जरी यशस्वी झाले असले तरी बंडखोर सहा खासदारांच्या संबंधी एक मोठी माहिती समोर येत आहे. हे सर्व खासदार १९ जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने शिंदेंच्या मंचावर दिसतील अशी चर्चा सुरू होती. मात्र या खासदारांच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त आता बदलण्यात आल्याची माहिती आहे. २१ किंवा २२ जून रोजी हे सर्व खासदार महाराष्ट्रात परत येणार असून, त्यानंतर त्यांचा पक्षप्रवेश केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**

### » आता मोकळीक द्यायची नाही, धडा शिकवायचा-शरद पवार

राऊत यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी झालेल्या चर्चेचा उल्लेख पत्रकार परिषदेत केला. उद्धव ठाकरे आणि शरद पवार या दोघांचाही फोन आला होता. पक्षाशी बेईमानी करणाऱ्यांना यापुढे मोकळीक देता कामा नये, अशी भूमिका पवारांनी व्यक्त केल्याचे संजय राऊत म्हणाले. मतदारसंघात जाऊन त्यांच्याविरोधात सभा घ्यायच्या, जनतेसमोर त्यांची भूमिका मांडायची. आवश्यक असेल तर मी स्वतः त्या भागात सभा घेण्यासाठी तयार आहे, असे पवारांनी सांगितल्याचे राऊत म्हणाले.

### » १० कोटी रुपये देऊन राजस्थानला पाठवले-संजय राऊत

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उत्तर प्रदेश) संकटात असताना, पक्षाचे नेते संजय राऊत यांनी गुरुवारी दावा केला की, त्यांच्या बंडखोर खासदारांना प्रत्येकी १०-१० कोटी रुपयांची अतिरिक्त रक्कम देण्यात आली असून त्यांना राजस्थानमधील एका सुरक्षित आश्रयस्थानी नेण्यात आले आहे. राऊत यांनी फुटीरतावादी शिवसेना (यूबीटी) खासदारांना देशद्रोही ठरवले आणि या खासदारांना आणि त्यांच्या मालमत्तेला देण्यात आलेली सुरक्षा तात्काळ काढून घेण्याची मागणी केली. बंडखोर खासदारांविरुद्ध पक्ष ऑपरेशन तुडवा सुरू करेल असा इशारा त्यांनी दिला आहे.


ठाकरेंच्या सहा खासदारांनी बंडखोरी करत शिंदेंची साथ देण्याचे निश्चित केले आहे. या सहा खासदारांनी त्यांचा स्वतंत्र गट तयार करून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्र दिले आहे. त्या संबंधी अद्याप कोणताही पुरावा किंवा फोटो समोर आला नसला तरी येत्या एक दोन दिवसात संसदेत त्याची घोषणा केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यानंतर खासदारांचा हा गट शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार असल्याची माहिती आहे. येत्या १९ जून रोजी गोरेगावच्या नेक्सो सेंटरमध्ये शिवसेनेच्या वर्धापन दिनाचा ◀◀ पान २ वर

## इकडून तिकडे गेलेल्या राज्यातील ६ खासदारांच्या सुरक्षेत व्यवस्थेत वाढ



विशेष प्रतिनिधी । मुंबई

उभाठा सेनेतून शिंदे सेनेत आलेल्या राज्यातील ६ खासदारांना संभाव्य धोका असल्याची माहिती समोर आल्यानंतर, राज्य गुप्तवार्ता विभागाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या सर्व ६ खासदारांना तात्काळ वाय प्लस दर्जाची (स्थानिक घटक) सुरक्षा व्यवस्था पुरवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्याचे गुप्तवार्ता आयुक्त शिरीष जैन यांच्या स्वाक्षरीने १७ जून २०२६ रोजी हे आदेश जारी करण्यात ◀◀ पान २ वर



## २८ जूनला होणार 'टीईटी' परीक्षा

### राज्यातील सव्वा दोन लाख शिक्षक बसले परिक्षेला

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात येणारी 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा-२०२६' (टीईटी) यंदा २८ जून रोजी होणार आहे. राज्यातील तब्बल दोन लाख २६ हजार २६३ शिक्षक ही पात्रता परीक्षा देणार आहेत. सध्या सेवेत असणाऱ्या शिक्षकांसह नियमित परीक्षार्थी अशा एकूण चार लाख २८ हजार १२२ परीक्षार्थींनी टीईटी परीक्षेसाठी नोंदणी केली असून, पेपर एक आणि पेपर दोन मिळून एकूण सहा लाख १२५ अर्ज केले आहेत. राज्यातील ३७ जिल्हास्तरावर जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एकूण एक हजार ७२९ परीक्षा केंद्रांवर ◀◀ पान २ वर

## मॉन्सून जैसे थे!

### राज्यात उन्हाचा चटका कायम; विदर्भात पावसाची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनच्या आगमनाची प्रतिक्षा शेतकरी करत आहेत. परंतु मॉन्सूनचा प्रवास ठप्प असून, मॉन्सून पोहचलेल्या भागातही पाऊस गायब आहे. त्यामुळे उन्हाच्या चटक्यासह उकाड्यात वाढ झाली असून काही भागात पावसाचा अंदाज आहे. कोकणात उन्हाचा चटका आणि दमट हवामानाची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उन्हाचा ताप वाढणार आहे. तर विदर्भात काही जिल्ह्यात वादळी पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात उष्ण व दमट हवामानासह तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार,



धुळे, जळगाव, नाशिक आणि सोलापूर जिल्ह्यात काही भागात उष्णतेच्या लाटेसह पावसाची शक्यता आहे. तर पुणे जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजा, वादळी वाऱ्यांसह हलका ते मध्यम पाऊस हजेरी लावण्याची शक्यता असून सांगली, सातारा कोल्हापूर जिल्ह्यात हलक्या सरींचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ◀◀ पान २ वर




## नीट-यूजी पुनर्परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष पोर्टल

मुंबई । प्रतिनिधी


**नीट यूजी परीक्षेच्या पेपर फुटीनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) २१ जून रोजी होत असलेल्या पुनर्परीक्षेबाबत मोठी खबरदारी घेतली आहे. नीट परीक्षेबाबत समाज माध्यमांवर पसरवल्या जाणाऱ्या अफवा, प्रश्नपत्रिका फुटल्याचे दावे आणि विविध प्रकारच्या गैरप्रकाराला आळा घालण्यास एनटीएने विशेष तक्रार नोंदणी पोर्टल सुरू केले आहे.**

या पोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक, कोचिंग संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांना परीक्षेदरम्यान घडणाऱ्या ◀◀ पान २ वर

# पक्ष फोडाफोडी आणि पक्षांतर बंदी कायद्यावरील प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील मोठ्या राजकीय फुटीनंतर पक्षांतर बंदी कायद्याच्या प्रभावीतेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. निवडून आलेले लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने मूळ पक्षापासून वेगळे झाल्यानंतरही त्यांचे सदस्यत्व कायम राहणे, तसेच पक्षाचे नाव आणि चिन्हावरील दावे निवडणूक आयोगापर्यंत पोहोचणे, या घटनांमुळे विद्यमान कायद्याच्या तरतुदींवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**




भारतीय राजकारणात पक्षांतराची परंपरा नवीन नाही. महाराष्ट्रातही विविध काळात राजकीय नेत्यांनी पक्षांतर किंवा नवीन पक्ष स्थापन करण्याचे निर्णय घेतले आहेत. माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी काँग्रेसमधून वेगळा राजकीय प्रवास करत स्वतंत्र पक्षाची स्थापना केली होती. त्यानंतरही राज्यात विविध राजकीय पुनर्रचना आणि आघाड्या पाहायला मिळाल्या. मात्र, अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींनी या चर्चेला अधिक वेग दिला. २०२२ मध्ये शिवसेनेतील मोठ्या गटाने वेगळी भूमिका घेतली, तर २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही मोठी फूट पडली. या दोन्ही प्रकरणांमध्ये पक्षाच्या मूळ नेतृत्वाने राजकीय दबाव आणि सत्तेच्या प्रभावाचे आरोप केले, तर बंडखोर गटांनी आपल्या निर्णयामागे वैचारिक आणि राजकीय मतभेद असल्याचे सांगितले. तज्ज्ञांच्या मते, विद्यमान पक्षांतर बंदी कायद्यातील काही तरतुदींचा वापर करून मोठ्या प्रमाणात आमदार किंवा खासदार एका गटातून दुसऱ्या गटात गेल्यास त्यांना अपात्रतेपासून संरक्षण मिळू शकते. त्यामुळे कायद्याचा मूळ उद्देश निवडून आलेल्या प्रतिनिधींचे वारंवार होणारे पक्षांतर रोखणे कितपत साध्य होत आहे,

### पक्षांतर बंदी कायद्यावर पुनर्विचाराची गरज?

राजकीय विश्लेषकांच्या मते, बदलत्या राजकीय परिस्थितीत पक्षांतर बंदी कायद्याच्या काही तरतुदींचा पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणावरील गटफुटी, पक्षाच्या नाव-चिन्हावरील दावे आणि न्यायालयीन प्रक्रिया यांमुळे कायद्याच्या उद्दिष्टांची परिणामकारकता तपासण्याची मागणी वाढत आहे.




याबाबत चर्चा सुरू आहे. महाराष्ट्रापुरताच हा मुद्दा मर्यादित नाही. विविध राज्यांमध्ये पक्षांतर, गटबाजी आणि पक्षीय पुनर्रचना यांसारख्या घडामोडी सातत्याने घडत आहेत. विरोधी पक्ष अनेकदा केंद्रीय यंत्रणांच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करतात, तर सत्ताधारी पक्ष हे आरोप फेटाळून लावत राजकीय निर्णयांना संबंधित नेत्यांचा स्वतंत्र निर्णय असल्याचे सांगतो.

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बंडखोरीचा उत्सव की लोकशाहीचा अंत?

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेले पक्षफोडीचे राजकारण आता एका नव्या टप्प्यावर पोहोचले आहे. शिवसेना पक्षात २०२२ मध्ये झालेल्या अभूतपूर्व बंडानंतर राज्याच्या राजकीय इतिहासात एक नवा अध्याय लिहिला गेला होता. त्यावेळी चाळीस आमदारांच्या बंडामुळे केवळ सरकारच बदलले नाही, तर महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचेही स्वरूप बदलले. आता त्याच कथानकाची पुनरावृत्ती खासदारांच्या पातळीवर होताना दिसत आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संसदीय बैठकीला सहा खासदारांनी अनुपस्थित राहून पक्ष नेतृत्वाला थेट आव्हान दिले आहे. त्यामुळे कथित ''ऑपरेशन टायगर'' यशस्वी झाल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. परंतु या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ एका पक्षाच्या राजकीय नुकसानीच्या दृष्टीने पाहणे चुकीचे ठरेल. कारण हा विषय एका पक्षापुरता मर्यादित नसून लोकशाही, जनादेश आणि राजकीय नीतिमत्ता यांच्या अस्तित्वाशी संबंधित आहे.

लोकशाहीमध्ये मतदार हा केंद्रबिंदू असतो. निवडणूक लढवताना प्रत्येक उमेदवार एका विशिष्ट विचारसरणीचे, पक्षाच्या भूमिकेचे आणि नेतृत्वाच्या धोरणांचे प्रतिनिधित्व करत असतो. मतदार त्याला वैयक्तिक प्रेमापोटी नव्हे, तर त्या पक्षाच्या विचारांवर विश्वास ठेवून मतदान करतो. अशा परिस्थितीत निवडून आल्यानंतर त्याच मतदारांचा कौल झुगारून वेगळ्या राजकीय छावणीत जाणे म्हणजे जनादेशाचा अपमान होय. दुर्दैवाने, आजच्या राजकारणात या नैतिकतेचे महत्त्व संपुष्टात आलेले दिसते.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात जे काही घडले, त्याने भारतीय लोकशाहीतील अनेक गंभीर प्रश्न उभे केले आहेत. एकेकाळी विचारधारेवर उभे राहणारे पक्ष आज संख्याबळाच्या राजकारणात अडकले आहेत. मतभेद मिटविण्यासाठी संवाद, संघटनात्मक प्रक्रिया किंवा लोकशाही पद्धतींचा वापर करण्याऐवजी थेट पक्षफोड हा पर्याय निवडला जात आहे. ही प्रवृत्ती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. देशभरात विविध राज्यांमध्ये विरोधी पक्षातील आमदार, खासदार किंवा नेत्यांना फोडून सत्ता टिकविण्याची किंवा मिळविण्याची स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर जनतेने दिलेल्या कौलाचे महत्त्वच कमी होत चालले आहे.

विशेष म्हणजे, या सर्व प्रक्रियेला आता राजकीय व्यवस्थेत वैधतेचे स्वरूप प्राप्त होत आहे. पक्षफोड करणाऱ्यांना गद्दार किंवा संधीसाधू म्हणण्यापेक्षा त्यांना ''राजकीय वास्तववादी'' म्हणून गौरविले जात आहे. सत्ता मिळविणे किंवा सत्तेत राहणे हाच राजकारणाचा अंतिम उद्देश असल्याप्रमाणे वातावरण निर्माण केले जात आहे. विचारधारा, निष्ठा, तत्त्वे आणि जनतेशी असलेली बांधिलकी यांना दुय्यम स्थान मिळत आहे. परिणामी राजकारण हे समाजसेवेचे माध्यम न राहता सत्तेचा व्यापार बनण्याचा धोका निर्माण झाला आहे. आज सर्वसामान्य मतदारांच्या मनात एक प्रश्न निर्माण होत आहे. जर निवडणुकीनंतर कोणताही लोकप्रतिनिधी कधीही आपली निष्ठा बदलू शकत असेल, तर मतदारांनी मतदान करायचे तरी कशासाठी? ज्या पक्षाच्या विरोधात प्रचार करून, ज्यांच्यावर टीका करून आणि ज्यांना पराभूत करण्यासाठी जनतेची मते मागून निवडून आलेले लोकप्रतिनिधी काही महिन्यांनंतर त्याच पक्षात प्रवेश करतात, तेव्हा मतदार स्वतःला फसवले गेले असल्याची भावना व्यक्त करतो. ही भावना लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. लोकशाहीचा पाया हा विश्वासावर उभा असतो. मतदार आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील विश्वास तुटू लागला की लोकशाही कमकुवत होते. आज देशात निवडणुका नियमितपणे होत आहेत, मतदानाचे प्रमाणही वाढत आहे; परंतु लोकशाहीची गुणवत्ता घटत चालल्याची चिंता अनेक अभ्यासक व्यक्त करत आहेत. कारण निवडणूक हा लोकशाहीचा केवळ एक भाग आहे. जनादेशाचा सन्मान, विरोधकांचा आदर, राजकीय नैतिकता आणि सार्वजनिक उत्तरदायित्व हेही तितकेच महत्त्वाचे घटक आहेत. दुर्दैवाने याच मूल्यांची सर्वाधिक पायमल्ली होताना दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर पक्षांतरबंदी कायद्याचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. लोकप्रतिनिधींनी पक्ष बदलल्यास त्यांचे सदस्यत्व तत्काळ रद्द होऊन त्यांना पुन्हा जनतेसमोर जाणे बंधनकारक केले पाहिजे. जनतेचा कौल हा कोणत्याही राजकीय सौदाबाजारापेक्षा मोठा आहे, हे पुन्हा अधोरेखित करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा निवडणुका केवळ औपचारिकता ठरतील आणि जनादेश हा राजकीय व्यवहाराचा एक भाग बनून राहील.

महाराष्ट्राने यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, गोपीनाथ मुंडे यांसारखे मोठे राजकीय नेते पाहिले आहेत. या नेत्यांमध्ये मतभेद होते, संघर्ष होते; पण राजकारणात काही मूल्ये आणि मर्यादा होत्या. आज त्या मर्यादा झपाट्याने नाहीशा होत आहेत. पक्षफोडीचे राजकारण हा केवळ एका पक्षाचा प्रश्न नाही; तो संपूर्ण लोकशाही व्यवस्थेच्या आरोग्याचा प्रश्न आहे. आज गरज आहे ती राजकीय स्वार्थाच्या पलीकडे जाऊन लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची. कारण पक्ष पुन्हा उभे राहू शकतात, नेते पुन्हा निवडून येऊ शकतात, सत्तेची समीकरणे पुन्हा बदलू शकतात; पण एकदा जनतेचा लोकशाहीवरील विश्वास ढासळला तर तो पुन्हा निर्माण करणे अत्यंत कठीण असते. महाराष्ट्रातील सध्याच्या घडामोडी हा इशारा म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. अन्यथा उद्या पक्ष जिवंत राहतील, सत्ताही टिकेल; मात्र लोकशाहीचा आत्मा हरवून जाईल आणि त्याची किंमत अखेरीस संपूर्ण समाजाला मोजावी लागेल.

# गांधीनगर भागात झाडूच्या आडून गांजा विक्री

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील गांधीनगर भागात झाडू बनवण्याच्या व्यवसायाआडून तरुण पिढीला नशेच्या विळख्यात ढकलणाऱ्या एका ७० वर्षीय वृद्ध महिलेला पेठ बीड पोलिसांनी रंगेहात अटक केली आहे. तिच्याकडून ३६,४४४ रुपये किमतीचा ६ किलो ७४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.**



कमलबाई राधाकिसन खंडागळे (वय ७०, रा. गांधीनगर, बीड) असे अटक करण्यात आलेल्या महिला आरोपीचे नाव आहे. पेठ बीड पोलीस ठाण्याचा नव्यानेच पदभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक निलेश केळे यांना १६ जून २०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडून एक खळबळजनक माहिती मिळाली. गांधीनगर भागातील कमलबाई खंडागळे ही महिला घरात झाडू बनवण्याचा व्यवसाय करते, मात्र या व्यवसायाच्या आडून ती वयात येणाऱ्या तरुण मुलांना गांजा विकत असून त्यांना नशेच्या आहारी लावत आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक केळे यांनी तात्काळ आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन अत्यंत गोपनीयरीत्या सापळा रचला. पोलिसांच्या पथकाने सदर महिलेच्या घरावर छापा टाकला. घराची झडती घेतली असता, झाडू बनवण्यासाठी ठेवलेल्या शिंदळीच्या (झाडूचे साहित्य) खाली लपवून ठेवलेला ६.०७४ किलोग्रॅम गांजा पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष ३६,४४४ रुपये किमतीचा हा गांजा जप्त केला. महिला पोलीस अंमलदारांच्या मदतीने आरोपी कमलबाई खंडागळे हिला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. याप्रकरणी शासनातर्फे फिर्याद देण्यात आली असून, पेठ बीड पोलीस ठाण्यात सदर महिलेविरुद्ध गु.र.नं. १९४/२०२६, कलम ८ (क), २० (ब), (ब) (अंमली पदार्थ विरोधी कायदा) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असून, या गुन्ह्याचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे करत आहेत.

# निवडणूक निरीक्षक डॉ.संजय कोलते यांची मतदार केंद्राला भेट

## केंद्रावर सोयी सुविधा असल्याने केले समाधान व्यक्त

**जालना । प्रतिनिधी**

**औरंगाबाद–जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ विधान परिषद निवडणूक २०२६ च्या कार्यक्रमानुसार आज दि. १८ जून, २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षक डॉ. संजय जी. कोलते, (भाप्रसे), आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे यांनी जालना जिल्ह्यास भेट दिली.**



या भेटी दरम्यान निवडणूक निरीक्षक डॉ. कोलते यांनी आज सकाळी तहसील कार्यालय, भोकरदन येथील तसेच दुपारी तहसील कार्यालय, जालना येथील मतदान केंद्रांना भेट देवून मतदान व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रावरील आवश्यक सुविधा, मतदान कक्षाची रचना, मतदारांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी–सुविधा तसेच सुरक्षा व्यवस्थेची तपासणी केली. मतदान केंद्रावरील व्यवस्था समाधानकारक असून, मतदान प्रक्रियेची तयारी उत्तम असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे मतदान प्रक्रियेबाबत आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शशिकांत हदगल, आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुकेशिनी कांबळे–पगारे यांची उपस्थिती होती. यावेळी बैठकीत मतदान प्रक्रिया सुलभ, पारदर्शक, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, मतदान साहित्याची उपलब्धता, मनुष्यबळाचे नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाची माहिती निवडणूक निरीक्षकांना सादर करण्यात आली. यावेळी निवडणूक निरीक्षकांनी मतदान केंद्रावरील तसेच मतदान प्रक्रियेत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून निवडणूक प्रक्रिया यशस्वी, पारदर्शक व निष्पक्षपणे पार पाडावी, अशा सूचना दिल्या.

## योग्य जीवनशैलीने रक्तदाब नियंत्रणात– डॉ.जयश्री रोहन मालुरे (टेकाळे)

बीड । प्रतिनिधी



उच्च रक्तदाबाच्या विकाराबद्दल तज्ज्ञांनी सांगितले की, आनुवंशिकता, लठ्ठपणा, चुकीचा आहार, तणाव आणि शरीराची कमी हालचाल यामुळे उच्च रक्तदाब होऊ शकतो. अनेक रुग्णांसाठी रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी औषधे आवश्यक असतात. त्यामुळे हृदयविकार, स्ट्रोक आणि मूत्रपिंडाच्या आजारांचा धोका कमी होतो.

उच्च रक्तदाबावरील औषधे सुरू झाली म्हणजे ती आयुष्यभर घ्यावीच लागतात असे नाही. उच्च रक्तदाबाचा त्रास सुरू झाल्यानंतर संबंधिताने वजन कमी केले, नियमित व्यायाम केला, आहारात. मीठाचे प्रमाण कमी केले, तणाव कमी केला तसेच धुम्रपान आणि मद्यपान टाळले तर रक्तदाबात सुधारणा होऊ शकते. अशा परिस्थितीत डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधांचा डोस कमी करता येऊङ्गङ्गशकतो. काही रुग्णांमध्ये औषधे हळूहळू बंद करण्याचाही विचार केला जाऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे. तथापि, रक्तदाब सामान्य झाला म्हणून स्वतःहून औषधे बंद करणे धोकादायक ठरू शकते. अनेकदा औषधांमुळेच रक्तदाब नियंत्रणात असतो. औषधे अचानक बंद केल्यास तो पुन्हा वाढू शकतो. तज्ज्ञांच्या मते, औषधे तात्पुरती की कायमची यापेक्षा रक्तदाब दीर्घकाळ नियंत्रणात ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे औषधांमध्ये कोणताही बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. नियमित तपासणी आणि योग्य जीवनशैली हेच रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचे सर्वोत्तम उपाय आहेत. असे मत डॉ. जयश्री रोहन मालुरे(टेकाळे), (एम.बी.बी.एस.) वैद्यकीय अधिकारी,उपजिल्हा रुग्णालय,केज, विठाई हॉस्पिटल,आठवडी बाजार रोड,गांधी चौक,गांधीनगर,कळंब मो.७७४३९९०९८८

## रोजगार सेवकांनी मस्टर काढण्यासाठी ३० हजार रुपये घेतले?

# शेतकरी व शासनाची फसवणूक

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**पंचायत समिती घनसावंगी अंतर्गत राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत घनसावंगी तालुक्यातील शेतकरी यांना विहीर खोदकाम व बांधकाम या साठी मौजे वडीरामसगांव येथे शासनस्तरावरून विहीरीना मंजूर मिळाली ग्रामपंचायत अंतर्गत गावपातळीवर रोजगार हमी योजनेचे काम पाहण्यासाठी गांवातील यूवक विलास नाथा जाधव यांची यांची निवड केलेली आहे.**



रोजगार हमी योजनेअंतर्गत सर्व कामे ते शेतकरी यांच्याकडून करून घेऊन कामाप्रमाणे मस्टर काढून देणे त्यांची जबाबदारी असते वडीरामसगांव येथिल शेतकरी सचिन संभाजी साबळे यांची जमिन मौजे बाचेगांव शिवारात आहे गट क्रमांक १० मध्ये त्यांना विहीर मंजूर आहे विहीरीचे मस्तर काढण्यासाठी रोजगार सेवक विलास नाथा जाधव यांनी एक मस्टर काढण्यासाठी १० हजार रुपये घेऊन त्यांचे मस्टर काढण्यात आले आहे प्रत्येक मस्टसाठी १० हजार रुपये देऊन म्हणजे तीन मस्टर काढण्यासाठी ३० हजार रुपये सचिन साबळे यांनी रोजगार सेवक विलास नाथा जाधव यांना देण्यात आले आहे सचिन साबळे यांना आतापर्यंत १७००००० रुपये मिळाले आहेत वडीरामसगांव येथे जवळपास ६०ते७० विहीरीना मंजूर मिळाली आहे सर्व शेतकरी यांच्याकडून प्रत्येकी मस्टर १० हजार रुपये प्रमाणे रोजगार सेवक विलास नाथा जाधव यांनी पैसे उकळून शासनाची व शेतकरी यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे सदरील वडीरामसगांव येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेली गट निहाय चौकशी करून दोषींवर कारवाई करून निलंबित करण्यात यावे. तसेच सचिन संभाजी साबळे यांचे असे म्हणे आहे कि,मला विहीरीपोटी मिळालेली रक्कम मी शासनाकडे भरण्यास तयार आहे आशा पदधतीचे निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती घनसावंगी व उपविभागीय अधिकारी अंबड आणि मुख्यकार्यकारी अधिकारी जि,प, जालना व जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना सचिन संभाजी साबळे नागरीक वडीरामसगांव यांनी चौकशी संदर्भात निवेदन देण्यात आले आहे

## अंबड पालिकेत नवीन मुख्यअधिकारी राहुल सूर्यवंशी रुजू

अंबड । प्रतिनिधी

मुख्याधिकारी श्री मनोज उकिर्डे यांचा शासनाप्रमाणे तीन वर्षाचा कालावधी संपूर्ण झाल्यामुळे त्यांची बदलीनंतर अंबड नगर परिषदे येथे आज नवीन मुख्याधिकारी श्री राहुल सूर्यवंशी हे रुजू झाले आहे. श्री सूर्यवंशी यांचे स्वागत दै राज्य लोकतंत्र प्रतिनिधी शिवाजी मस्के यांनी केले आहे. मुख्याधिकारी श्री राहुल सूर्यवंशी यांची पहिली पोस्टिंग सन २०१० मध्ये आयुक्त कार्यालय अमरावती येथे झाली होती यानंतर वर्धा जिल्ह्यामध्ये आर्वी नगरपरिषद येथे मुख्याधिकारी म्हणून सेवा बजेली आहे. सन २०१२ मध्ये अंबड नगरपरिषद येथे



मुख्याधिकारी म्हणून पदभार सांभाळलेला आहे. तसेच पैठण येथे मुख्याधिकारी म्हणून सेवा बजावली आहे. तसेच कळमनुरी इथे मुख्याधिकारी म्हणून प्रशासकीय सेवा बजावली आहे.यानंतर जालना जिल्हाधिकारी कार्यालय येथे डीपीओ म्हणून प्रशासकीय कामकाज केलेली आहे. यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे महानगरपालिकेत उपयुक्त म्हणून पदावर कार्यरत होते आता श्री सूर्यवंशी यांची बदली अंबड नगरपरिषद मध्ये मुख्याधिकारी म्हणून झाली आहे.

## पान १ वरून...

### कर्जमुक्ती योजनेसाठी

शिक्षण, कृषी आणि सहकार मंत्री सदस्य म्हणून सहभागी असतील. पात्र शेतकऱ्यांना लाभ वेळेत मिळणे, योजना पारदर्शकपणे राबविणे आणि लाभार्थी शेतकऱ्यांना बँकांकडून तातडीने नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून देणे यावर ही समिती लक्ष ठेवणार आहे. याशिवाय, राष्ट्रीयकृत, खासगी आणि ग्रामीण बँकांकडील शेतकऱ्यांच्या पीक कर्ज व पुनर्गठित अनुत्पादित कर्जांना कर्जमुक्ती किंवा एकवेळ समझोता योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली आणखी एक समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती बँकांसोबत वाटाघाटी करून अनुत्पादित कर्जाच्या खतावणी शिल्लक रकमेवर देण्यात येणाऱ्या सवलतीचे प्रमाण निश्चित करणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होणार असून कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी अधिक परिणामकारक आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

--------------

### इकडून तिकडे गेलेल्या राज्यातील ६

आले आहेत. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन टायगर अंतर्गत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेतील सहा खासदार शिंदे सेनेमध्ये स्वतंत्र गट करून आल्यामुळे भविष्यात त्यांच्याविषयीचा संभाव्य धोका लक्षात घेत गुप्तवार्ता विभागाच्या पत्रानुसार, सुरक्षेत वाढ करण्यात आलेल्या खासदारांची नावे खालीलप्रमाणे आहेत. संजय देशमुख (यवतमाळ), संजय जाधव (परभणी), संजय दिना पाटील (ईशान्य मुंबई), नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली), ओमराजे निंबाळकर (धाराशिव), भाऊसाहेब वाघचौरे (शिर्डी). ''नुकत्याच समोर आलेल्या संभाव्य धोक्याचा विचार करता, सर्व घटक प्रमुखांने संबंधित खासदारांना तात्काळ वाय प्लस दर्जाची सुरक्षा व्यवस्था पुरवावी,'' असे आदेश या पत्रात देण्यात आले आहेत. तसेच, हे खासदार जेव्हा आपल्या मतदारसंघात किंवा कार्यक्षेत्रात दौऱ्यावर असतील, तेव्हा स्थानिक परिस्थिती आणि धोक्याचा अंदाज घेऊन कोणत्याही प्रकारची अनुचित घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, अशा कडक सूचनाही सर्व पोलीस प्रमुखांना देण्यात आल्या आहेत. पुढील जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत या सुरक्षेचा आढावा घेऊन ती वाढवायची की कायम ठेवायची, याचा निर्णय घेण्यात येईल. गेल्या चार दिवसांपासून ऑपरेशन टायगर सुरू होते. ठाकरे सेनेकडून बोलावलेल्या बैठकीला गैरहजर राहिलेल्या खासदारांनी थेट एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या शिवसेनेमध्ये ते सामील झाल्याचे आता जवळपास निश्चित झाले आहे परंतु इकडून तिकडे गेल्यानंतर उबाठा सेनेमधील सैनिकांनी त्यांच्या विरोधात रोष व्यक्त केला आहे. हेच पाहता या सर्व सहा खासदारांना वाय प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

------------

### खासदारांचे विलिनीकरण

कार्यक्रम होणार आहे. याच कार्यक्रमात हे बंडखोर खासदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू होती. आता मात्र त्यामध्ये बदल झाला आहे. १९ जून रोजीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमामध्ये, शिंदेंच्या व्यासपीठावर हे खासदार दिसणार नाहीत. त्यामुळे या खासदारांविना हा कार्यक्रम पार पडणार आहे. बंडखोरी केलेल्या या खासदारांचे मतपरिवर्तन होऊ नये यासाठी त्यांना जयपूरच्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आल्याची माहिती आहे. जयपूरमध्ये सहापैकी चार खासदार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर इतर दोन खासदार वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. या सर्व खासदारांना २१ जून किंवा २२ जून रोजी महाराष्ट्रात परत आणण्यात येणार आहे. तोपर्यंत लोकसभेमध्ये त्यांच्या विलिनीकरणाची घोषणा झाली असेल. त्यामुळे त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही. शिंदेंच्या शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर सुरू झाल्यानंतर १६ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता हे बंडखोर खासदार दिल्लीत पोहोचल्याची माहिती आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी एकनाथ शिंदे यांनी या खासदारांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. या सहा खासदारांनी १७ जून रोजी सकाळी ७ वाजता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली आणि स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचं पत्र दिल्याची माहिती आहे. त्यानंतर सहापैकी चार खासदारांना सुरक्षेच्या कारणास्तव जयपूरमधील हॉटेलमध्ये ठेवण्यात आलं तर दोन खासदार इतरत्र गेल्याचे सांगितले जात आहे.

--------------

### नीट–यूजी पुनर्परीक्षेदरम्यान

गैरप्रकारची माहिती माहिती एनटीएला देणे शक्य होणार आहे. सार्वजनिक परीक्षांची पारदर्शकता, निष्पक्षता आणि विश्वासार्हता कायम राखण्याच्या उद्देशाने एनटीएने हा उपक्रम हाती घेतला आहे. या पोर्टलच्या माध्यमातून प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका बेकायदेशीर असल्याचा दावा करणारे संकेतस्थळ, समाज माध्यमे किंवा मेसेजिंग चॅनेल्सवर देण्यात येणारी माहिती, पैसे घेऊन प्रश्नपत्रिका, पेपर फुटल्याची माहिती किंवा हमखास यश मिळवून देण्याचे आश्वासन देणाऱ्या व्यक्ती अथवा गटांविरोधातही विद्यार्थी व पालकांना तक्रार नोंदविता येणार आहे. त्याचप्रमाणे एनटीए अधिकारी, परीक्षा कर्मचारी किंवा सरकारी प्रतिनिधी असल्याचे खोटे भासवणाऱ्या व्यक्तींबाबतची माहिती देखील नागरिकांना या पोर्टलवर देता येणार आहे. याशिवाय विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीती किंवा संभ्रम निर्माण करण्याच्या उद्देशाने पसरविण्यात येणाऱ्या कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या अथवा फसव्या माहितीची नोंदही करता येणार आहे. तसेच केंद्र सरकारशी संबंधित दिशाभूल करणाऱ्या माहितीची तक्रार पीआयबी फॅक्ट चेककडे व्हॉट्सॲप हेल्पलाइन किंवा ई–मेलद्वारेही विद्यार्थ्यांना करता येणार आहे.

-------------

### मॉन्सून जैसे थे!

तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेसह संध्याकाळी पावसाच्या सरी हजेरी हजेरी लावतील, असा अंदाज असून लातूर, धाराशिव आणि परभणी जिल्ह्यांत हलक्या सरी हजेरी लावतील अशी शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. विदर्भातील अकोला जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. उर्वरित भागात कोरड्या हवामानाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

**चार दिवसांत मान्सूनला गती येणार**

मॉन्सूनच्या वाटचालीसाठी पोषक प्रणाली नसल्याने राज्यातील मॉन्सूनची प्रगती ठप्प आहे. गुरूवारी देशभरातील मॉन्सूनची वाटचाल 'जेसै थे' होती. मॉन्सूनची सीमा हरणई, सोलापूर, हैदराबाद, भद्राचलम, कोरापुट, फुलबनी, रांची, जमुई, मुझफ्फरपूर भागांपर्यंत होती. पुढील ४ ते ५ दिवसांत मॉन्सूनच्या पुढील प्रगतीसाठी परिस्थिती अनुकूल असून तेलंगणाच्या आणखी काही भागात, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागात मॉन्सून पुढे सरकण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

---------------

### २८ जूनला होणार 'टीईटी' परीक्षा

ही परीक्षा होणार आहे. टीईटी परीक्षेतील 'पेपर एक'साठी ७०१ केंद्र, तर 'पेपर दोन'साठी एक हजार २८ केंद्रावर वर्ग खोल्या, प्रवेश, लॉबी, केंद्र संचालक कक्ष असे एकूण १८ हजार ७१७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. या परीक्षेसाठी एक लाख ९० हजार ६६९ पुरुष आणि दोन लाख ३७ हजार ४४८ महिला आणि पाच तृतीयपंथी अशा एकूण चार लाख २८ हजार १२२ परीक्षार्थींनी 'पेपर एक' आणि 'पेपर दोन' असे मिळून सहा लाख १२५ अर्ज भरले आहेत. यात सात हजार १३९ दिव्यांगांचा समावेश आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे आणि आयुक्त महेश चोथे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

------------

### पक्ष फोडाफोडी आणि पक्षांतर बंदी

राजकीय घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील पक्षांसमोर संघटनात्मक स्थैर्य टिकवण्याचे आव्हान उभे राहिले आहे. लोकसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करूनही पक्षातील प्रमुख नेते आणि लोकप्रतिनिधी कायम ठेवणे हे कोणत्याही राजकीय पक्षासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या पक्षांना संघटन बळकट करण्यावर भर द्यावा लागणार असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. अखेरीस, लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही राजकीय निर्णयाचे अंतिम मूल्यांकन मतदारच करतात. त्यामुळे पक्षफोड, पक्षांतर किंवा नेतृत्वबदल यांसारख्या घटनांबाबत जनतेचा कौल हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो.

-----------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. १९ जून २०२६
३

## थोडक्यात

### गोरक्षनाथ विद्यालयाच्या प्राचार्य पदी संजय बडे यांची निवड

वडवणी । प्रतिनिधी

मकरध्वज शिक्षण संस्था संचलित ढेकणमोहा येथील,गोरक्षनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्यपदी संजय सोमनाथराव बडे पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.



डोंगर पट्ट्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्राचार्य सोमनाथरावजी बडे सर यांनी ढेकणमोहा या ठिकाणी गोरक्षनाथ विद्यालयाची सुरुवात केली होती त्यांच्या कारकिर्दीमध्ये शालेय क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्यामुळे शाळेचे नावलौकिक झाले तसेच हजारो विद्यार्थी डॉक्टर,इंजिनिअर,सैन्यदल,शिक्षक तसेच प्रशासकीय क्षेत्रामध्ये सर्विसला लागले होते त्यामुळे बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रामध्ये या विद्यालयाचे अग्रगणने स्थान होते. त्यांचाच वसा आणि वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी श्री.संजय बप्पा बडे सर यांची पदोन्नती करून विद्यालयाच्या प्राचार्यपदी निवड करण्यात आली आहे त्यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. सोमनाथरावजी बडे सर, माजी मुख्याध्यापक डी.एस.मुंडे सर तसेच सामाजिक कार्यकर्ते शाम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी संजय बप्पा बडे यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली उल्लेखनीय कार्य घडेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

### सीए परीक्षेत मधुर मालपाणी उत्तीर्ण



माजलगाव । प्रतिनिधी

येथील मधुर दत्तप्रसाद मालपाणी सीए अंतिम परीक्षा चांगल्या गुणांने उत्तीर्ण झाले. शहरातील मिर्ची चे ठोक व्यापारी दत्तप्रसाद (बाळु) रमेशचंद्र मालपाणी (टाकरवन) यांचा तो मुलगा आहे. त्याचे दहावी पर्यंत चे शिक्षण सिंधफना पब्लिक स्कूल माजलगाव येथे झाले आहे. व पुढील शिक्षण पुणे येथे पुर्ण केले. या यशाबद्दल माहेश्वरी सभा,व्यापारी महासंघ,मोंढा मित्र परिवार, सुप्रभात ग्रुपच्या वतीने मधुर कौतुक करण्यात आले आहे.तथा सर्व स्तरातून मधुर मालपाणी कौतुक होत आहे.

### गौशिया सादेक शेख हिची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी



गौशिया सादेक शेख हिची महाराष्ट्र पोलीस मुंबई दलात निवड झाली आहे. गौशिया हिने आर्थिक अडचणी, अनेक आव्हाने आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. बालपणापासूनच पोलीस दलात जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते त्या प्रमाणे तिने सातत्यपूर्ण प्रयत्न केले

गौशिया हिच्या यशामागे तिची मेहनत, चिकाटी,आत्मविश्वास तसेच कुटुंबीयांचा मिळालेला भक्कम पाठिंबा या गोष्टी असून परिस्थितीला दोष न देता ध्येय निश्चित करून मेहनत केली तर यश नक्की मिळते, याचे प्रेरणादायी उदाहरण गौशिया सादेक शेख हिने समाजासमोर ठेवले आहे. गौशिया सादेक शेख हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ब्रम्हगाव प्रकरणातील मागण्या मान्य भिमाशंकर यादव यांचे उपोषण स्थगित

बीड । प्रतिनिधी




गेवराई तालुक्यातील ब्रम्हगाव येथे जागृत देवस्थान मारुतीरायाची विटंबना व गोहत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी, तसेच दुग्धाभिषेक करणाऱ्या निरपराध हिंदू तरुणांवरील गुन्हे मागे घ्यावेत, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय रामराज्य निर्माण सेनेचे अध्यक्ष भिमाशंकर यादव पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण प्रशासनाने मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्यानंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले. यासाठी भाजप नेत्या, नगरसेविका डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी यशस्वी मध्यस्थी केली.

दि.११ जूनपासून सुरू असलेल्या या उपोषणामध्ये ब्रम्हगाव प्रकरणातील आरोपींवर मकोका लावणे, गोहत्याप्रकरणी महाराष्ट्र गोवंश हत्या बंदी कायद्यान्वये कठोर कारवाई करणे, धार्मिक तेढ निर्माण केल्याबद्दल संबंधित कलमांखाली गुन्हे दाखल करणे, आरोपींवर एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धता व तडीपारीची कारवाई करणे, गावात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त ठेवणे, हिंदू तरुणांवरील कथित खोटे गुन्हे मागे घेणे, मुख्य सूत्रधारांवर कारवाई करणे, उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करणे आणि गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करणे आदी मागण्या करण्यात आल्या होत्या. दरम्यान, भाजप नेत्या तथा बीड नगरपरिषदेच्या नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी या प्रकरणात मध्यस्थी करत उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. त्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ आणि जिल्हा विशेष शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे यांची भेट घेतली. या बैठकीत उपोषणकर्त्यांनी आपल्या मागण्या पोलिस प्रशासनासमोर मांडल्या. संबंधित मागण्यांबाबत कायदेशीर चौकटीत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्याने आंदोलनकर्त्यांनी उपोषण तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी भाजपचे नगरसेवक, सकल हिंदू समाजाचे पदाधिकारी, विविध हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आंदोलन तात्पुरते स्थगित

पोलीस प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, तर पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. सदरील आंदोलन तात्पुरते स्थगित करत असल्याचे अखिल भारतीय रामराज्य निर्माण सेनेचे अध्यक्ष भिमाशंकर यादव पाटील यांनी म्हटले आहे.

## स्वामी विवेकानंद नगर, बालेपीर परिसरात नालीचे पाणी रस्त्यावर ; नागरिक त्रस्त

बीड । प्रतिनिधी




बीड शहरातील स्वामी विवेकानंद नगर, बालेपीर, नगर रोड परिसरात नालीचे पाणी थेट रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अनेक दिवसांपासून ही समस्या कायम असून संबंधित प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरत असून डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. तसेच या रस्त्यावरून दररोज शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांची ये-जा होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या असतानाही अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. पावसाळ्याच्या तोंडावर ही समस्या अधिक गंभीर बनण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

नागरिकांनी बीड नगर परिषद प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन नालीची स्वच्छता करावी, सांडपाण्याचा निचरा सुरळीत करावा व रस्त्यावरील पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी केली आहे.

''स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या बीड शहरात नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे ही दुर्दैवी बाब आहे,'' अशी प्रतिक्रिया परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली.

## बीड शहरातील अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांचा सामाजिक कार्यकर्त्यांकडून सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील वाहतूक कोंडी कमी करून नागरिकांना दिलासा मिळावा तसेच रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध व सुरळीत करण्यासाठी प्रभावी मोहीम राबविणाऱ्या जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक वैभव पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांचा बीड शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**



गेल्या काही दिवसांपासून जिल्हा वाहतूक शाखेने शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटविणे, अवैध पार्किंगवर कारवाई करणे, वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बाबींवर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती करणे अशा विविध उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या आहेत. या मोहिमेमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान व सुरक्षित होण्यास मदत झाली असून नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे. याच कार्याची दखल घेत मातृभूमी प्रतिष्ठान, लेक लाडकी अभियान बीड जिल्हा, महा एनजिओ फेडरेशन,महाराष्ट्र राज्य तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पोलिस अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठान, बीडचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजयजी तांदळे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कमलताई लांडगे, सामाजिक कार्यकर्त्या मिराताई डावकर, आम्रपाली साबळे, ज्येष्ठ समाजसेवक सुधीर देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांनी वाहतूक शिस्त ही केवळ पोलिस प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शहर स्वच्छ, सुंदर आणि वाहतूक कोंडीमुक्त ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.सत्काराला उत्तर देताना पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांनी, ''शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन सातत्याने कार्यरत राहील. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून सहकार्य केल्यास बीड शहर अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि कोंडीमुक्त होईल,'' असा विश्वास व्यक्त केला. पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनीही नागरिकांच्या सहकार्यामुळेच अशा मोहिमा यशस्वी होत असल्याचे सांगून भविष्यातही वाहतूक व्यवस्थेसाठी कठोर आणि लोकाभिमुख उपाययोजना राबविण्यात येतील, असे नमूद केले.

## युवा शेतकरी संघर्ष समितीचा पश्चिम महाराष्ट्रात दणका ; आंदोलन यशस्वी, शेतकऱ्यांच्या खात्यात ऊस बिल जमा

माजलगाव । प्रतिनिधी



केदारेश्वर साखर कारखान्याकडील थकीत ऊस बिलाच्या प्रश्नावर युवा शेतकरी संघर्ष समितीने धडक मोर्चा काढत कारखाना प्रशासनाला जाब विचारला. समितीच्या आक्रमक भूमिकेनंतर कारखाना प्रशासनाने तत्काळ सकारात्मक निर्णय घेत शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बिलाची रक्कम वर्ग करण्यास सुरुवात केली.

स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये खाते असलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यांना त्याबाबतचे मोबाईल संदेश देखील प्राप्त झाले आहेत. तसेच ज्या शेतकऱ्यांची खाती वेंकटेश बँकेत आहेत, त्या शेतकऱ्यांच्या खात्यावरही यादीप्रमाणे व ऊस पुरवठ्यानुसार रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.कारखाना प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, वेंकटेश बँकेतील शेतकऱ्यांच्या खात्यावर दि १६ जुन मंगळवार पासुन रक्कम जमा होणार असून आज दि.१७ जून बुधवार रोजी शेतकऱ्यांना ती रक्कम काढता येणार आहे.यावेळी कारखान्याच्या व्यवस्थापनाशी झालेल्या चर्चेत भविष्यात ऊस बिलाबाबत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, सर्व देयके वेळेत अदा करण्यात येतील तसेच शेतकऱ्यांनी निर्धास्तपणे आपला ऊस कारखान्याकडे द्यावा, असे आश्वासन देण्यात आले.

युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा धडक मोर्चा शेतकऱ्यांच्या हिताचा विजय ठरला असून आंदोलनाला मोठे यश मिळाल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

तुकाराम नावडकर
युवा शेतकरी संघर्ष समिती

## आष्टीत मंगळवारपासून माऊली नगरात धाकट्या पंढरीचे स्वरूप; माऊलींच्या सप्ताहास प्रारंभ ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांची श्रीमद् भागवत कथा; धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील माऊली नगर परिसरात येत्या २३ जूनपासून भक्तिमय वातावरणाची अनुभूती मिळणार असून संत प.पू. ब्र.भू. ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संगीत श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ व भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ ते ३० जून या कालावधीत होणाऱ्या या सप्ताहामुळे माऊली नगरात अक्षरशः धाकट्या पंढरीचे स्वरूप निर्माण होणार आहे.

ज्ञानेश्वरी मुखोद्गत असलेले रामायणाचार्य तथा भागवताचार्य ह.भ.प. भागवत महाराज बादाडे यांच्या सुश्राव्य संगीत श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाच्या प्रारंभी ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांच्या हस्ते कलशपूजन होणार असून विविध मान्यवर वारकरी संप्रदायातील संत-महंतांच्या हस्ते ग्रंथपूजन, दीपप्रज्वलन व अन्य धार्मिक विधी पार पडणार आहेत.

सप्ताहामध्ये दररोज विष्णुसहस्रनाम, गीतापाठ, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, हरिपाठ, हरिकीर्तन तसेच दुपारी २ ते ५ या वेळेत संगीत श्रीमद्? भागवत कथा आणि रात्री कीर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक ह.भ.प. बालाजी महाराज कवठेकर, मृदंगाचार्य ह.भ.प. ओम महाराज नन्नवरे, गायनाचार्य ह.भ.प. अनिल महाराज गरूड यांच्यासह अनेक कीर्तनकार, भजनकार व वारकरी मंडळींची उपस्थिती लाभणार आहे.



मंगळवार दि. २३ जून रोजी नामधारक ह.भ.प. संत आसाराम महाराज केळसांगवीकर यांच्या नामसंकीर्तनाने सप्ताहास प्रारंभ होणार आहे. त्यानंतर ह.भ.प. पांडुरंग महाराज मुंडे, ह.भ.प. समाधान महाराज, ह.भ.प. डॉ. जलाल महाराज सय्यद, भागवताचार्य भागवत महाराज बादाडे, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवेबापू महाराज यांची कीर्तने होणार आहेत.

सोमवार दि. २९ जून रोजी हिंदूभूषण ह.भ.प. सुनीताताई आंधळे महाराज (आळंदी) यांचे पुण्यकालाचे कीर्तन तर रात्री अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. श्रीमद्? भागवत कथा विश्रामानंतर ज्ञानेश्वरी, अभंगगाथा, श्रीमद्? भागवत व संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या प्रतिमेची टाळ-मृदंग, ढोल-लेझीम व बँडपथकासह भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

मंगळवार दि. ३० जून रोजी संगीत विशारद ह.भ.प. आदिनाथ औटे सर व माऊली सेवा भजनी मंडळ यांचे संगीत भजन होणार असून, त्यानंतर संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे उत्तराधिकारी तपोनिधी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होईल. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने होणार आहे.

सात दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात पहाटेच्या काकड आरतीपासून ते रात्रीच्या हरिकीर्तनापर्यंत अखंड नामस्मरणाचा गजर घुमणार आहे. माऊली नगर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार असून हजारो भाविकांच्या उपस्थितीने धाकट्या पंढरीचे दर्शन घडणार आहे.

या धार्मिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानामृताचा लाभ घ्यावा, असे आवाहन माऊली सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे..

पान ६ वरून...

### मातोश्रीशी गद्दारी

गेला या निषेध आंदोलनात उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सचिव नंदु येवले, उपतालुकाप्रमुख नितीन नवले,तालुकासहसचिव संदिप भानप, युवानेते मुकेश घुमरे, बाबु सिरसाट, महादेव जोगदंड, मगर मामा, अशोक खांडे, समाधान हिंगणे, आकाश घोरपडे, सुनिल इंगळे, भैय्या घोरपड, बाबु कुटे यांच्यासह शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीडमध्ये शिवदुर्गा-शिवसंवाद

अनिलदादा जगताप, महिला संपर्कप्रमुख श्रीमती संगीताताई चव्हाण, महिला आघाडी जिल्हाप्रमुख श्रीमती चंद्रकलाताई बांगर, नगरसेविका श्रीमती शितलताई चक्रे, उपजिल्हाप्रमुख श्रीमती शारदाताई डोईजड तसेच तालुकाप्रमुख (बीड) श्रीमती जयश्रीताई वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी, संपर्कप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, युवासेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण परिसर भगवामय वातावरणाने भारावून गेला. बैठकीत महिला सक्षमीकरण, सक्षम संघटन जनतेचा विश्वास या त्रिसूत्रीच्या बळावर आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना विजयाचा नवा इतिहास रचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. महिला शक्तीचा जागर, शिवसेनेचा विचार आणि जनतेशी थेट संवाद या माध्यमातून संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**महिला सक्षमीकरणातून सक्षम संघटन उभे करणे हेच शिवदुर्गा-शिवसंवाद दौऱ्याचे उद्दिष्ट!**

खा. डॉ ज्योतीताई वाघमारे, राष्ट्रीय सचिव शायनाताई एन.सी., उपनेत्या विजयाताई पोटे, उपनेत्या संगीताताई ठोंबरे, उपनेत्या कला शिंदे ताई यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिला आघाडीचे संघटन अधिक मजबूत, गतिमान आणि विजयाभिमुख करण्यासाठी बैठकीत सविस्तर मार्गदर्शन केले. गाव ते बूथ स्तरापर्यंत महिला नेतृत्व निर्माण करणे, नवीन महिला शाखाप्रमुखांची निवड, संघटन विस्तार, मतदारयादी पुनरिक्षण (SIR), घराघरांत जनसंपर्क अभियान तसेच निवडणूक तयारीची प्रभावी रणनीती यावर त्यांनी विशेष भर दिला. दरम्यान महिला आघाडी बीड जिल्हा संपर्कप्रमुख संगीताताई चव्हाण यांनी आपल्या मनोगतामध्ये कार्य अहवाल सादर करत बीड जिल्ह्यात महिला आघाडी अधिकाधिक सक्षम बनवणार असा विश्वास दिला.

### जि.प.कर्मचारी पतसंस्थेच्या

गायकवाड यांनी अर्ज भरले होते. मतदानानंतर सुधीर ठोंबरे यांना आठ तर संतोष गायकवाड यांना पाच मते मिळाली. सुधीर ठोंबरे यांना तीन मते अधिकची मिळाल्याने सचिव पदासाठी त्यांची निवड जाहीर करण्यात आली. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष सुनील घोडके, उपाध्यक्ष नारायण शिंदे व इतर संचालक उपस्थित होते. ही निवडणूक प्रक्रिया पिठासन अधिकारी रामचंद्र ठोसर यांनी पूर्ण केली त्यांचे इतर सहकारी व पतसंस्थेचे व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी त्यांना सहकार्य केले. या निवडीबद्दल सुधीर ठोंबरे यांचे मित्र परिवाराकडून आणि पतसंस्थेच्या सदस्यातून अभिनंदन होत आहे.

### गेवराईतील वाळू घोटाळा :

तपास करण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, पोलीस अधीक्षक यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या असून, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही गोदावरी बचाव सर्व पक्षीय कृती समितीने दिला आहे. गेवराईतील कथित वाळू घोटाळ्याबाबत यापूर्वीही अनेक आरोप-प्रत्यारोप झाले आहेत. आता सर्व पक्षीय कृती समितीने थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत गंभीर आरोप केल्यामुळे प्रशासन कोणती भूमिका घेते आणि चौकशीची दिशा काय ठरते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### जुन महिन्यातही सकाळ

बळीराजाचे डोळे आभाळाकडे जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने ग्रामीण भागातील शेतकरी हवालदिल झाला आहे. खरीप हंगामासाठी शेतकरी मशागतीचे कामे वेळेत पूर्ण केली खरी मात्र आता पावसाअभावी त्यांच्यावर केवळ दिवस मोजण्याची वेळ आली आहे. जून महिना अवघा १५ दिवस राहिला आहे सर्वच जुन कडक उन्हात गेल्याने शेतकऱ्याच्या चिंतेत कमालीची वाढ झाली आहे. शेतकरी दररोज सकाळी-सायंकाळी चातकासारखी आभाळाकडे नजर लावून बसला आहे. पाऊस कधी येईल आणि पेरणी कधी सुरू होणार... याच प्रश्नाची चर्चा सध्या गावागावात रंगताना दिसत आहे.

वादळी वाऱ्यासह काहीसा पाऊस पडल्याने वातावरणात थोडा गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे मान्सूनपूर्व पावसाची आशा निर्माण झाली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी उन्ह कडक सुरू झाल्याने नागरिकांचा भ्रमनिरास झाला. शहरात वेगाने वारे वाहत असतानाही उष्णतेचा प्रभाव कमी झाला नाही.सकाळ पासून उष्णतेची तीव्रता अधिक वाढत चालल्याने नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. त्यामुळे प्रमुख रस्ते आणि बाजारपेठांमध्ये नेहमीपेक्षा वर्दळ कमी झाल्याचे दिसून येत आहे. वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण वाढल्याने उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. ढगाळ वातावरणामुळे सूर्यकिरणांची तीव्रता कमी झाली. मात्र,हवेत ओलावा वाढल्याने नागरिकांना घामाच्या धारांचा सामना करावा लागत आहे.

# चिया पिकाचे सुधारित वाण संशोधन, बीजोत्पादन होणार

## ‘वनामकृवि’ आणि महाबीज यांच्यात सामंजस्य करार

चिया पिकाचे सुधारित वाणाचे संशोधन, बीजोत्पादन आणि व्यापारीकरण यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (वनामकृवि) आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अधिकृत, उच्च उत्पादनक्षम आणि दर्जेदार चिया बियाणे उपलब्ध होऊ शकेल.

हा करार पाच वर्षांसाठी वैध राहणार असून संयुक्त मालकी हक्क, गुणवत्ता नियंत्रण, बीज परवाना आणि व्यापारीकरणाच्या बाबी त्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा आणि ‘महाबीज’चे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी तर ‘महाबीज’तर्फे महाव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण व संशोधन) डॉ. प्रफुल्ल लहाने यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी संशोधन संचालक डॉ.



खिजर बेग, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, ‘महाबीज’चे विभागीय व्यवस्थापक जगदीशसिंग खोकड, जिल्हा व्यवस्थापक रज्जाक शेख, नियंत्रक अनंत कदम, विभागप्रमुख तथा उपसंचालक (संशोधन) डॉ. हिराकांत काळपांडे आदी उपस्थित होते. राज्यात चिया पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. शेतकऱ्यांकडून प्रमाणित बियाण्यांची मागणीही वाढत आहे. मात्र, अधिकृत सुधारित वाण उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना स्थानिक आणि कमी गुणवत्तेच्या बियाण्यांवर अवलंबून राहावे लागत होते. शेतकऱ्यांची ही गरज ओळखून ‘वनामकृवि’ आणि ‘महाबीज’ यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिया पिकाच्या काळ्या व पांढऱ्या बियाण्यांच्या उच्च उत्पादनक्षम वाणांच्या विकासासाठी संशोधन सुरू करण्यात आले आहे. या करारानुसार कृषी विद्यापीठ संशोधन, मूल्यांकन व शिफारसी विकसित करेल. तर ‘महाबीज’कडून बीजोत्पादन, प्रसार, प्रात्यक्षिके आणि विक्रीची जबाबदारी पार पाडली जाणार आहे. कुलगुरू डॉ. मिश्रा म्हणाले, ‘‘विद्यापीठ आणि महाबीज यांच्यातील ही भागीदारी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, उत्पादनक्षमता वृद्धिंगत करणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल. दोन्ही संस्थांनी समर्पित भावनेने कार्य करून राज्यातील शेती विकासाला नवी दिशा द्यावी.’’

# हुमणी अळीपासून असे टाळा नुकसान



पावसाच्या सुरुवातीच्या सरी पडल्यानंतर ग्रामीण भागातील अनेक शेतांमध्ये हुमणी किडीच्या भुंग्यांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत येतो. हे भुंगेरे रात्रीच्या वेळी कडुनिंब, निरगुडी, तुती, जांभूळ, बाभूळ, बोर आदी झाडांवर जमा होऊन पाने खात असल्याचे आढळून आले आहे. हुमणी किडीच्या प्रौढ भुंग्यांचा वेळीच बंदोबस्त न केल्यास पुढे अंडी व अळ्यांमुळे ऊस, आले, हळद, सोयाबीन आणि भुईमूग पिकांचे मोठे नुकसान होऊ शकते. हुमणीचे भुंगेरे दिवसा जमिनीत लपून राहतात आणि सायंकाळी बाहेर पडून झाडांची पाने खातात. त्यानंतर ते जमिनीत अंडी घालतात. या अंड्यांपासून तयार होणाऱ्या अळ्या पिकांची मुळे कुरतडून पीक वाळवतात. त्यामुळे संभाव्य नुकसान होऊ नये म्हणून शेतकरी काही उपययोजनाही करत असल्याचे समोर आले आहे.

नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना : १) भुंगे प्रकाशाकडे आकर्षित होतात. यासाठी शेतात किंवा झाडांनजीक रात्री सात ते दहा या वेळेत प्रकाश सापळे किंवा विजेचे दिवे लावावेत, दिव्याच्या खाली भांड्यात रॉकेल किंवा कीटकनाशक टाकावे, जेणेकरून त्यात भुंगेरे मरून पडतील २) रात्रीच्या वेळी कडुनिंब किंवा बाभळीच्या झाडाखाली ताडपदरी अंथरून झाडांच्या फांद्या जोरात हलवाव्या, खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. ३) उन्हाळी नांगरट केलेल्या शेतात किंवा प्रादुर्भावग्रस्त भागात पक्षी थांबे उभारावे. यामुळे बगळे, कावळे व इतर पक्षी जमिनीतून निघणारे भुंगेरे व अळ्या वेचून खातात. ४) प्रादुर्भाव जास्त असल्यास झाडावर कीटकनाशकांची फवारणी तसेच जमिनीत जैविक कीटकनाशकाचा वापर करावा. जैविक कीटकनाशक हुमणी कीड आणि अळीसाठी प्रभावी काम करते. किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर, रात्री झाडांवरील भुंगे गोळा करून नष्ट करणे, पक्षी थांबे उभारणे तसेच जैविक व रासायनिक उपाययोजना कराव्यात. विशेषतः गावपातळीवर सामूहिक मोहीम राबवून भुंगेरे नष्ट केल्यास किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. हुमणी किडीमुळे आगामी खरीप हंगामातील पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात.

# कॅरी निर्भीक कोंबडी वर्षाला देते २०० अंडी; पोल्ट्री व्यवसायासाठी उत्तम पर्याय

राज्यासह देशभरात कुक्कुट पालन व्यवसाय करणाऱ्यांसाठी एक कोंबडी चांगलीच फायदेशीर ठरणारी आहे. या कोंबडीचे पालन केल्यास उत्तम फायदा होण्याची गॅरंटी आहे. बेरोजगार तरुणांना कुक्कुट पालनासाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडून बँक कर्ज देखील मिळते. त्यामुळे ज्यांना कमी भांडवलात कुक्कुट पालनाचा व्यवसाय करायचा असेल त्यांच्यासाठी कॅरी निर्भीक ही कोंबडी चक्क वरदान ठरणार आहे.



व्यवसायातून मिळेल दामदुप्पट नफा : कॅरी निर्भिक ही कोंबडीची एक देशी जात आहे, जिचे मांस प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध आहे. ही कोंबडी अतिशय चपळ असते. आकाराने मोठी, ताकदवान, दिसायला देखणी, स्वभावाने लढाऊ आणि मजबूत प्रतिकार शक्तीची असते. सुमारे २० आठवड्यांच्या आतच या कोंबड्यांचे वजन १८४७ ग्रॅमपर्यंत पोहोचते. दरवर्षी या कोंबड्या तब्बल १९० ते २०० अंडी देतात. आणि प्रत्येक अंड्यांचे वजन ४५ ग्रॅम असते. कॅरी निर्भीक कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म सुरू करून कमी खर्चात शेतकऱ्यांना दामदुप्पट नफा कमाविता येऊ शकतो. इंडो जर्मन यांच्या संयुक्त प्रयत्नातून या कोंबडीची जात साल २००० मध्ये विकसित करण्यात आली होती.

कॅरी निर्भीकची वैशिष्ट्ये : वर्षाला १९० ते २०० अंडी देते. प्रत्येक अंडे ४५ ग्रॅम वजनाचे असते. २० आठवड्यांत १८४७ ग्रॅमपर्यंत वजन वाढते. प्रथिने गुणधर्मांनी समृद्ध, चविष्ट आणि रसाळ असते. मजबूत रोगप्रतिकारशक्ती, रोगांना बळी पडत नाही. कमी खाद्यपदार्थावरही चांगली वाढ होते.

कर्ज मिळण्याचीही सुविधा : कॅरी निर्भीक कोंबडी कमी खर्चात जास्त नफा देते. यामुळे लहान शेतकरी आणि तरुण उद्योजक सहजपणे हा व्यवसाय सुरू करू शकतात. विशेष म्हणजे राज्य सरकार कुकुटपालन योजनेद्वारे कुक्कुटपालनासाठी बँक कर्ज देखील मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. ज्यामुळे ग्रामीण भागात या प्रजातीच्या कोंबडीच्या मदतीने सहज कुकुटपालन व्यवसाय करू शकतात.

# चुनखडी जमिनीतूनही मिळू शकते चांगले उत्पन्न

चुनखडीयुक्त जमिनीचा सामू अल्कलीधर्मी असतो. यामध्ये विद्राव्य स्वरूपातील कार्बोनेट आणि बायकार्बोनेटचे प्रमाण जास्त असून सामू सर्वसाधारणपणे ७.५ ते ८.५ असतो. सामू ८.५ च्या वर शक्यतो जात नाही. जर सोडियमचे प्रमाण जास्त झाले तर सामू ८.५ च्या वर जाण्याची शक्यता असते. चुनखडीयुक्त जमिनीचा सामू वाढल्यामुळे काही अन्नद्रव्यांचा जमिनीतून ऱ्हास होतो, तर काही अन्नद्रव्ये इतर संयुगांना बांधले जाऊन पिकांना उपलब्ध होत नाहीत. चुन्यामुळे प्रत्यक्ष, तसेच अप्रत्यक्षरीत्या नत्र, स्फुरद, मॅग्नेशियम, पालाश, मँगेनीज, जस्त, तांबे आणि लोह यांच्या उपलब्धतेवर विपरीत परिणाम होतो. सर्वसाधारणपणे पिकांच्या मुळाच्या भोवती आम्लधर्मी वातावरण असते, तसेच द्विदल धान्य मुळाद्वारे हायड्रोजन सोडून मुळाभोवती वातावरण आम्लधर्मी ठेवतात. चुनखडीयुक्त जमिनीत या क्रियेत बदल होऊन पिकांच्या मुळांची वाढ योग्य प्रकारे होत नाही. यामुळे लोहासारख्या अन्नद्रव्याची कमतरता प्रकर्षाने जाणवायला लागते. कारण लोह आम्लधर्मी वातावरणात जास्त उपलब्ध असते आणि अल्कलीधर्मी वातावरणात लोहाची उपलब्धता कमी होते. या क्रियेमध्ये कार्बोनेटचा सहभाग जास्त होऊन लोह पिकास उपलब्ध होत नाही. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये नत्राचे व्यवस्थापन : चुनखडीयुक्त जमिनी अल्कलीधर्मी असल्यामुळे नत्राचे रूपांतर होण्याच्या गतीवर अनिष्ट परिणाम होतो. जमिनीतील नायट्रोसोमोनस, नायट्रोबॅक्टरसारखे जिवाणू नत्राचे अमोनिया स्वरूपामध्ये रूपांतर करतात. नायट्रेट स्वरूपातील नत्र पिके शोषून घेतात. म्हणून ही क्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. नायट्रिफिकेशन ही क्रिया जमिनीचा सामू ७ ते ८ च्या दरम्यान असल्यास जास्त गतीने होते. जमिनीचा सामू जर ५ ते ७.५ च्या दरम्यान असेल तर अमोनियमयुक्त नत्र खताचा वापर फायदेशीर ठरतो. परंतु जमिनीमध्ये कार्बोनेटचे प्रमाण अधिक असल्याने अमोनियम खताचा परिणाम दिसून येत



नाही. उलटपक्षी नत्राचा ऱ्हास होऊन नुकसान होते. जमिनीतील कॅल्शियम कार्बोनेटसोबत अमोनियमची प्रक्रिया होऊन अमोनियम कार्बोनेट तयार होते. यातील अमोनियम कार्बोनेटचे रूपांतर अमोनिया वायू, पाणी आणि कर्बवायूमध्ये होते आणि नत्राचा ऱ्हास होतो.

त्यामुळे अमोनियम सल्फेट, अमोनियम फॉस्फेटसारख्या खताचा वापर चुनखडीयुक्त जमिनीत करू नये. त्याऐवजी अमोनियम नायट्रेट, अमोनियम क्लोराइडयुक्त खतांचा वापर करावा. अर्थात क्लोराइडचे जमिनीतील प्रमाण तपासून या खताचा वापर हितावह ठरतो. नत्र खतांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. नत्र खतांचे रूपांतर अमोनिया वायूमध्ये होऊन ऱ्हास टाळण्यासाठी खते जमिनीच्या पृष्ठभागावर न राहता ताबडतोब मातीत मिसळली जावीत. त्यासाठी जमिनीत योग्य ओलावा असणे अथवा खते दिल्यावर जमिनीस पाणी देणे महत्त्वाचे ठरते.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरदाचे व्यवस्थापन : जमिनीतील स्फुरद किंवा खताद्वारे दिलेल्या स्फुरदाची उपलब्धता जमिनीचा सामू ६ ते ७.५ च्या दरम्यान असताना अधिक असते. चुनखडीयुक्त जमिनीचा सामू ७.५ पेक्षा जास्त असल्याने पिकांना पुरेसा स्फुरद उपलब्ध होत नाही. स्फुरदाचे रूपांतर अत्यंत कमी विद्राव्य अशा फॉस्फेट, मॅग्नेशियम फॉस्फेट या संयुगामध्ये होते. यालाच स्फुरदाचे स्थिरीकरण म्हणतात. सतत किंवा नेहमी चुनखडी जमिनीत सुपर फॉस्फेट, डाय अमोनियम फॉस्फेटसारख्या खतातून स्फुरद देणे योग्य नाही. कारण त्यांची विद्राव्य क्षमता ही अत्यंत कमी असते. उलटपक्षी त्यांचे स्थिरीकरणच जास्त होते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरद खते दाणेदार स्वरूपात, तसेच सेंद्रिय खतासोबत दिल्याने स्फुरदयुक्त खतांची उपयोगिता वाढते. या पद्धतीमुळे खतांचा जमिनीतील कणांशी कमी संपर्क व संयोग होतो आणि अविद्राव्यता कमी होते.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पालाश आणि मॅग्नेशियमचे व्यवस्थापन : उपलब्ध पालाश आणि मॅग्नेशियम चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पुरेशा प्रमाणात दिसून येतात. कारण या जमिनी तयार होत असतानाच खनिजांची झीज होऊन विनिमयक्षम पालाश आणि मॅग्नेशियमची भर पडते. कमी पावसामुळे पाण्याद्वारेही अन्नद्रव्ये वाहून जात नाहीत. परंतु मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि पालाश या अन्नद्रव्यामध्ये असमतोल होऊन मॅग्नेशियम व पालाशची कमतरता पिकांमध्ये दिसून येऊ शकते. याचे प्रमुख कारण जमिनीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण, पालाश व मॅग्नेशियमपेक्षा जवळपास ८० टक्के जास्त असल्यामुळे आणि मॅग्नेशियमचे प्रमाण अंदाजे फक्त ४ टक्के असल्याने मॅग्नेशियम व पालाशचे शोषण कॅल्शियमच्या तुलनेत कमी होते आणि पिकांमध्ये या मूलद्रव्यांची कमतरता दिसून येते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पालाशचे प्रमाण सर्वसाधारणपणे जास्त असले तरीही पालाश अन्नद्रव्याची कमतरता सद्यःस्थितीमध्ये दिसून येत आहे. पालाश अन्नद्रव्याच्या वापरास पीक प्रतिसाद देत असल्याचे दिसते. इतर मॅग्नेशियमयुक्त खते देऊन पानातील मॅग्नेशियमचे प्रमाण चुनखडीयुक्त जमिनीमध्ये वाढवता येत नाही. त्यासाठी पालाश, मॅग्नेशियम सल्फेटसारखी विद्राव्य खते फवारणीद्वारे वापरणे जास्त हितावह आहे.

या महत्वाची बाबी लक्षात घ्या : चुनखडीयुक्त जमिनीत अन्नद्रव्यांच्या व्यवस्थापनासाठी मातीचा योग्य नमुना घेऊन मातीपरीक्षण करून घेणे व त्यानुसार खतांचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये अमोनियमयुक्त व युरिया खते ताबडतोब मुळाशी गेली पाहिजेत. त्यासाठी जमिनीमध्ये ओलावा नसेल तर खते दिल्यानंतर पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे.

चुनखडीयुक्त जमिनीमध्ये स्फुरदाची योग्य मात्रा नियमितपणे पिकांना देणे गरजेचे आहे. त्यासाठी स्फुरद विद्राव्य जिवाणूंचा वापर फायदेशीर ठरतो. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पिकांना मॅग्नेशियम व पालाशची गरज भासते. त्यासाठी मॅग्नेशियम सल्फेट आणि पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फायद्याची ठरते. जस्त आणि मँगेनीजची कमतरता कमी करण्यासाठी या अन्नद्रव्यांची खताद्वारे (०.५ टक्के) दोन ते तीन वेळा फवारणी करावी. चुनखडीयुक्त जमिनीत लोहाच्या कमतरतेचा अनिष्ट परिणाम कमी करण्यासाठी लोहाची (१ ते २ टक्के) फवारणी फायदेशीर आहे. गंधक आणि गंधकयुक्त अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. सेंद्रिय पदार्थांचा- उदा. कंपोस्ट, शेणखत इत्यादी- वापर केल्याने चुन्याची दाहकता कमी होऊन अन्नद्रव्य उपलब्धतेमध्ये वाढपदार्थाचा वापर करावा.




### महत्वाच्या घटना

१५७६ : मुघल शासक अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात हळदी घाटीच्या युद्धाला सुरुवात झाली.
१७७६ : महाराणा प्रताप व अकबर यांच्यात 'हळदी घाटा' ची सुप्रसिध्द घनघोर लढाई झाली.
१८१५ : वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा दारुण पराभव
१८३० : फ्रान्सने अल्जीरिया ताब्यात घेतले.
१९०८ : फिलीपाइन्स विश्वविद्यालाची स्थापना झाली.
१९३० : चीनचा सम्राट डोवागर लोंग्यू याने देशातील सर्व परदेशी व्यक्तींना ठार करण्याचा हुकूम दिला.
१९४६ : डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्याच्या मडगाव शहरातून गोवा मुक्तीचे रणशिंग फुंकले. या घटनेच्या स्मरणार्थ पणजींतील एका रस्त्याला '१८ जून रस्ता' असे नाव देण्यात आले आहे.
१९५६ : रँग्लर र. पु. परांजपे पुणे विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू झाले.
१९८१ : जनावरांमधे आढळणार्या लाळ्या-खुरकुत रोगावरील पहिली जनुकीय लस विकसित झाली.
१९८३ : अंतराळवीर सैली राइड या अंतराळात प्रवास करणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.
१९८७ : एम. एस. स्वामिनाथन यांना प्रथम जागतिक अन्न पुरस्कार (वल्ड फूड) मिळाला.
२००६ : कॅझसॅट या कझाकस्तानच्या पहिल्या उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध घेण्यासाठी विशेष उपग्रह पाठविला.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात मुसळधार पाउस पडून मंदाकिनी व अलकनंदा नद्यांना महापूर. शेकडो मृत्युमुखी, हजारो बेघर.
२०१७ : किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया सुपर सीरिजचे जेतेपद भारतीय बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने इंडोनेशिया सुपर सीरिज प्रिमिअरच्या पुरुष एकेरीत जेतेपद पटकावले. असे करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.
२०१७ : भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने समकालीन खेळाडूंमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : राजपूत नेपाळ शासक तसचं, नेपाळचे पहिले पंतप्रधान व राणा राजवंशाचे संस्थापक जङ्गबहादुर राणा यांचा जन्मदिन.
१८८७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, शिक्षक, राजनीतिज्ञ, तसचं, बिहार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री डॉ.अनुग्रह नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९९ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (मृत्यू: १ डिसेंबर १९८५)
१९११ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९७)
१९३१ : के. एस. सुदर्शन प्रखर राष्ट्रवादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५ वे सरसंघचालक (मृत्यू: १५ सप्टेंबर २०१२)
१९३१ : ब्राझील देशाचे समाजशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि राजकारणी तसचं, ब्राझील देशाचे माजी राष्ट्रपती फर्नांडो हेन्रिक कार्डोसो यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतीय वंशीय संगणक वैज्ञानिक, बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थान, संगणक विज्ञान विभागाचे माजी प्राध्यापक ई.वी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन.
१९४२ : पॉल मॅकार्टनी संगीतकार, संगीतसंयोजक, वादक, गीतलेखक, 'बीटल्स'चा सदस्य
१९४२ : थाबो म्बेकी दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९६५ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९८६ : फ्रेंच व्यावसायिक टेनिसपटू रिचर्ड गॅब्रिएल सायर गैस्के यांचा जन्मदिन.
१९८७ : इंग्लंड देशाचे महान क्रिकेटपटू मोईन अली यांचा जन्मदिन.
१९९४ : युवा भारतीयह टेनिसपटू प्रार्थना गुलाबराव ठोंबरे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' झाशीची राणी इंग्रजांचा पाठलाग टाळण्याच्या प्रयत्नात झालेल्या चकमकीत मृत्यूमुखी पडल्या (जन्म: १९ नोव्हेंबर १८२८)
१९०१ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (जन्म: १० एप्रिल १८४३)
१९०२ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (जन्म: ४ डिसेंबर १८३५)
१९३६ : मॅक्झिम गॉर्की रशियन लेखक (जन्म: २८ मार्च १८६८)
१९५८ : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ आक्टोबर १९००)
१९६२ : जे. आर. तथा नानासाहेब घारपुरे पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे संस्थापक आणि प्राचार्य, नामवंत विद्वान (जन्म:)
१९७४ : सेठ गोविंद दास स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती, साहित्यिक (जन्म: १६ आक्टोबर १८९६)
१९९९ : श्रीपाद रामकृष्ण काळे ५२ कादंबर्या आणि ११०० हुन अधिक कथा लिहिणारे साहित्यिक, कथा आणि कादंबरीकार (जन्म: )
२००३ : जानकीदास हिन्दी चित्रपटातील चरित्र अभिनेते (जन्म: १९१०)
२००५ : भारतीय क्रिकेटपटू मुश्ताक अली यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१४)
२००९ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (जन्म: १४ एप्रिल१९२२ शिबपूर, कोमिल्ला, बांगला देश)
२०२० : लच्छमानसिंग लेहल मेजर-जनरल वीर चक्र, परम विशिष्ठ सेवा (जन्म: ९ जुलै १९२३)
२०२१ : मिल्खा सिंग द फ्लाइंग शीख, धावपटू पद्मश्री (जन्म: ८ ऑक्टोबर १९३५)

# एकनाथराव शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी महिलांनी पदर खोचून कामाला लागावे -खा. ज्योती वाघमारे

जालना । प्रतिनिधी

राजकारणात मागितल्याशिवाय काही मिळत नाही असा सध्याचा काळ आहे. देवालाही काही मागायचे असेल तर नवस बोलावा लागतो; पण माझ्यासारख्या एका सामान्य घरातील महिलेला खासदारकी देऊन देशाच्या सर्वोच्च सभागृहात पाठविणारे एकनाथराव शिंदे हे खरे देवमाणूस आहेत. महिलांसाठी लाडक्या बहिणीसह विविध योजना राबविणारे एकनाथराव शिंदे यांना २०२९ च्या निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी सर्व महिलांनी पदर खोचून कामाला लागावे असे आवाहन खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी केले.शिवसेनेच्या शिवदुर्गा संवाद दौरा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एन.सी., माजी आमदार संगीता ठोंबरे, उपनेत्या कला शिंदे, विजया पोटे, प्रीती बंड तसेच नगरसेविका दर्शना खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




जालना, भोकरदन आणि बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या आजी-माजी पदाधिकारी आणि शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्यांच्या सोबत प्रत्यक्ष संवाद साधल्यानंतर आपल्या प्रमुख भाषणात बोलताना खासदार वाघमारे म्हणाल्या की, बऱ्याच कार्यक्रमात नेते येतात, बोलतात आणि निघून जातात. कार्यकर्त्यांना खुर्च्या आणि सतरंज्या उचलण्याचे काम करावे लागते. परंतु शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे यांनी सामान्य कार्यकर्त्यांसोबत बोलले पाहिजे, त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांचे प्रश्न प्रत्यक्षात सोडविले पाहिजे, म्हणून हा शिवदुर्गा संवाद आयोजित केला आहे. राज्यातील या शिवसंवाद दौऱ्याची सुरुवात जालना येथून होत आहे. शाखाप्रमुख ते मुख्यमंत्री असा प्रवास केलेल्या आमचे नेते एकनाथराव शिंदे यांनी कार्यकर्ते बोलले पाहिजे आणि नेत्यांनी ऐकले पाहिजे या भूमिकेतून शिवदुर्गा संवाद दौऱ्याची संकल्पना मांडली. आम्ही फक्त पोस्टमनच्या भूमिकेत आहोत. संघटना वाढीसाठी महिला कार्यकर्त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि सूचना याचा तपशीलवार अहवाल आम्ही आपले नेते एकनाथराव शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे सुपूर्द करणार आहोत. याआधी संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांनी भर उन्हाळ्यात ४५ डिग्री तापमान असताना महाराष्ट्राचा शिवसंवाद दौरा केला आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. राज्यातील महिलांचेही प्रश्न, समस्या ऐकून घेण्यासाठी आम्हाला तुमच्याकडे पाठविले आहे. आम्ही फक्त पोस्टमनच्या भूमिकेत आहोत. एकनाथराव शिंदे यांनी सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेचा महाराष्ट्रातील अडीच कोटी महिलांनी लाभ घेतला. याशिवाय लेक लाडकी योजना, मोफत एसटी, अशा कितीतरी योजना महिलांसाठी राबविल्या आहेत. महिलेने नऊ महिने पोटात बाळ वाढवायचे त्याचे पालनपोषण करायचे परंतु त्या बाळाच्या नावापुढे नाव लागत होते ते वडिलांचे! या प्रकाराची संवेदनशील दखल घेत एकनाथराव शिंदे यांनी बाळाच्या नावापुढे आधी आईचे आणि नंतर वडिलांचे नाव लावायचे हा ऐतिहासिक निर्णय घेतला, याकडे खासदार वाघमारे यांनी विशेष लक्ष वेधले. पुढील काळात महिलांसाठी विधानसभा, लोकसभेत आरक्षण असणार आहे. त्यामुळे महिलांनी शाखा स्थापन करणे, सदस्य नोंदणी करणे, बूथ याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पक्ष विस्तार करताना कुणाचा दबाव येत असेल, कुणी दडपशाही करीत असेल तर त्याचा बंदोबस्त कसा करायचा हे शिवसैनिकाला सांगण्याची गरज नाही.

माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मोठ्या संख्येने आलेल्या महिलांचे स्वागत करताना सांगितले की, लाडक्या बहिणींसह विविध लाभाच्या योजना महिलांसाठी राबविणारे, त्यांचा सन्मान करणारे एकनाथराव शिंदे यांच्यावर महिलांचे विशेष प्रेम आहे. महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठीच त्यांनी शिवदुर्गा संवाद दौरा सुरू केला आहे. त्याची सुरुवातही आपल्या जिल्ह्यातूनच केली आहे. शिवसेनेच्या वरिष्ठ महिला नेत्या जालन्यात आल्या आहेत. त्यांचा राज्यातील दौरा संपल्यानंतर राज्यातील सर्व महिलांचा एक नवदुर्गा संवाद मेळावा नवरात्रीच्या सुमारास मुंबईत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत घेण्याबाबत आपण त्यांना विनंती करणार आहोत, असे सांगितले.

जालन्यात अर्जुनभाऊ खोतकर यांचे काम उत्तम असल्याची आज प्रचिती आली आहे. महिलांचे कल्याण आणि सन्मान करणारे एकनाथराव शिंदे यांना २०२९ च्या निवडणुकीत पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी महिलांनी पदर खोचून कामाला लागावे असे आवाहन केले. यावेळी शायना एनसी यांनी भोकरदन विधानसभा मतदारसंघात पक्ष वाढविण्याचे आवाहन केले. माजी आमदार संगीताताई ठोंबरे, उपनेत्या कला ताई शिंदे, विजयाताई पोटे, प्रीतीताई बंड यांनीही उपस्थित महिलांच्या प्रश्नांना उत्तरे देत संघटना वाढीसाठी विशेष सूचना केल्या. शिवसेनेच्या युवा नेत्या तथा नगरसेविका दर्शनाताई खोतकर म्हणाल्या की, एक काळ असा होता की पदावर महिला आणि काम पती पाहायचे. आता मात्र महिला पुढे येऊ लागल्या आहेत. एका हाकेवर आजच्या शिवदुर्गा संवादासाठी मोठ्या संख्येने महिला आल्या आहेत. शिवसेनेने महिलांसाठी खूप योजना राबविलेल्या आहेत. त्यापैकी लाडकी बहीण ही स्टार योजना गेमचेंजर ठरली आहे. आ. अर्जुनभाऊ खोतकर यांनी लाडक्या बहिणी योजनेचा जिल्ह्यातील सर्वाधिक महिलांना लाभ मिळवून दिला आहे. नगरविकास खाते शिवसेनेकडे असूनही जालना पालिकेत शिवसेनेच्या नगरसेवकांकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आणून दिले. आगामी काळात जालना जिल्ह्यात महिला संघटना बळकट झालेली दिसेल, असे काम करू अशी ग्वाही दर्शनाताई खोतकर यांनी दिली.

### महिलांनी उपस्थित केलेले प्रश्न

आजच्या शिवदुर्गा संवाद मेळाव्यात महिला कार्यकर्त्या व पदाधिकाऱ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. त्यात बचत गटासाठी गावात जागा उपलब्ध करून देणे, बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तू शासनाने खरेदी करणे, धुनी,भांडी करणाऱ्या महिलांसाठी विशिष्ट मदतीची योजना राबविणे, जिल्हा नियोजन समिती मार्फत महिलांनाही विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे, बचत गटाच्या वस्तूंसाठी शहरात मॉल उभा करणे, महिलांचे आर्थिक बळकटीकरण करावे अशा सूचना आणि समस्या यावेळी उपस्थित करण्यात आल्या. यात दर्शनाताई झोल कालिंदीताई ढगे,, आशाताई भुतेकर, उषाताई पांगारकर,सरलाताई जो हजारे अनिता वानखेडे, रोहिणी पिंपळे इत्यादी महिलांनी आपले म्हणणे मांडले.

---

# 'रुपम वाईन्स'च्या मालकावर गुन्हा दाखल



## ६ लाख ७२ हजारांची अवैध दारू जप्त

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंदे आणि बेकायदेशीर दारू वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत जालना पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नवीन मोंढा परिसरातून एका लोडिंग वाहनातून अवैध दारूची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे मोती बार समोर सापळा रचून संशयास्पद पांढऱ्या रंगाचे 'महिंद्रा जितो' वाहन (क्र. -२१-७५५९) अडवून त्याची झडती घेण्यात आली. तब्बल६ लाख ७२ हजार,९६०/- रुपये किमतीचा विदेशी व देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत वाहनासह एकूण ६,७२,९६०/- रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

जप्त मुद्देमाल-विदेशी दारू व बिअरः रॉयल स्टॅग (१३ बॉक्स), इम्पेरिअल ब्ल्यु (४ बॉक्स), रॉयल चॅलेंज, मॅकडॉवेल्स नं. १, स्टर्लिंग रिझर्व्ह ८७. मॅजिक मोमेंट्स, ग्रँड मास्टर आणि ६१ बॉक्स विविध बँडची बिअर. (एकूण किंमतः ५११,४४०/-)देशी दारूः सखु संत्रा टैंगो व भिंगरी संत्रा (३ बॉक्स), (किंमतः १९,५२०/-)वाहनः पाढऱ्या रंगाचे महिंद्रा जित्तो लोडिंग वाहन. (किमतः ११,५०,०००/-)एकूण जप्त मुद्देमाल: ₹६,७२,९६०/-आरोपी नोहा दिपक चव्हाण (वय २८ वर्षे, रा. शकुंतला नगर, मंठा चौफुली, जालना, रुपम वाईन्स'चे मालक राम सेटगुरंन - ५२०/२०२६ कलम ६५ (अ) (ई), महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला सदरची कारवाई मा. श्री. तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक , मा. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक सो. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने व, सपोनि श्री. सचिन खामगळ, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार पोहेकॉ/ लोखंडे, पोहेकॉ / श्रीवास, पोकों / करतारे, पोकों/ काळे.

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधीतांना याद्वारे जाहीर करण्यात येते की, स्व. शेषराव भगवान चव्हाण यांचे निधन दिनांक २७/०९/२०२१ रोजी झाले असून ते मौजे राठोड नगर शिवनी तांडा पो, नेर ता. जि. जालना येथील रहिवासी असून त्यांच्या नावे असलेली जालना शहर येथील मालमत्ता सिटी सर्वे क्र. ४७१/अ -१ प्लाट क्र. १९ एकूण क्षेत्र २२०.०० चौ.मि. हे असून त्या पैकी आर्धे क्षेत्र ११०.०० चौ. मि. एवढे हे मयत शेषराव भगवान चव्हाण यांचे नांवे आहेत. याचा नगर भूमापन क्रमांक ११४०३/ब/२१ हे आहे. सदर मालमत्तेच्या अभिलेखात कायदेशिर वारस खालील प्रमाणे आहे.

१) यमुनाबाई शेषराव चव्हाण :-पत्नी
२) विकास प्रकाश चव्हाण :-मुलगा
३) राणी प्रकाश राठोड :-मुलगी-विवाहित
४) शिल्पा कुमार चव्हाण : सून

सदर मालमत्ते बाबत कोणाचा हक्क, दावा, आक्षेप किंवा इतर कोणतही संबंध असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह कळवावे. विहित मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाचाही दावा नसल्याचे गृहित धरुन वारस हक्काची पुढील कार्यवाही करण्यात येईल व त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्यास आम्ही जबाबदार राहणार नाही.

जाहीर प्रगटन देणार
नांव :-विकास शेषराव चव्हाण
पत्ता :-राठोड नगर शिवनी तांडा पो.
नेर ता.जि. जालना
मो.नं.:-७८७५७१००२२

---

# किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमधील स्नेहसंमेलन वादाच्या भोवऱ्यात

## कथित पाकिस्तानी गाण्यावर विद्यार्थ्यांचे नृत्य, हातात तलवारी; शाळेची मान्यता रद्द करून अध्यक्ष, शिक्षक व आयोजकांवर गुन्हे दाखल करून अटक करा-आ. लोणीकर

परतुर । प्रतिनिधी

परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. व्हिडिओतील दृश्यांच्या आधारे माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधित शाळेची मान्यता तात्काळ रद्द करावी तसेच संस्था अध्यक्ष, संबंधित शिक्षक व कार्यक्रम आयोजकांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. आमदार लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये विद्यार्थ्यांकडून कथितरित्या ''गुस्ताख-ए-नबी की एक ही सजा, सर तन से जुदा'' या वादग्रस्त पाकिस्तानी गाण्यावर नृत्य सादर करण्यात आल्याचे दिसत आहे. यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात तलवारी देण्यात आल्याचाही दावा करण्यात येत आहे. तसेच कार्यक्रमादरम्यान दहशतवादाशी संबंधित असल्याचा आरोप करण्यात येत असलेल्या काही छायाचित्रांचे प्रदर्शन करण्यात आल्याचेही व्हायरल व्हिडिओमध्ये दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे.



शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, संविधानिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि लोकशाही संस्कार रुजविण्याचे कार्य करतात. मात्र अशा प्रकारच्या घटना समाजात चुकीचा संदेश देणाऱ्या असून विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम करू शकतात, असे लोणीकर यांनी नमूद केले. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कोणतीही दया न दाखवता कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी आ.बबनराव लोणीकर यांनी केली आहे.आ. लोणीकर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून व्हायरल व्हिडिओची सत्यता पडताळून पाहण्याच्या आणि जबाबदार व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्याच्या सूचना केल्याचे सांगितले. संबंधित संस्था अध्यक्ष, कार्यक्रम आयोजक आणि जबाबदार शिक्षकांवर राष्ट्रीय सुरक्षा कायदा (रासुका) अंतर्गतही कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून कठोर भूमिका घ्यावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रविरोधी, हिंसाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला थारा दिला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश शासनाने द्यावा, असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.दरम्यान, व्हायरल झालेल्या व्हिडिओची सत्यता, त्यातील गाणे, दृश्ये आणि कार्यक्रमातील सादरीकरणाबाबत अधिकृत चौकशी अहवाल अद्याप समोर आलेला नसून, प्रशासनाकडून तपास सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

---

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९१९**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती आलिम चाँद शेख रा. दाढेगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आलिम चाँद शेख | स्वतः | २०/०५/१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०५५**
**दिनांक - १३/१२/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती साजेदाबी मुसाभाई शेख रा. ताडहादगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साजेदाबी मुसाभाई शेख | स्वतः | २९/०८/१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११४८**
**दिनांक - ०९/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सईदा मुखसाभाई शेख रा. ताडहादगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सईदा मुखसाभाई शेख | स्वतः | ०१/०१/१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

---

# अजून पाऊस लांबल्यास सोयाबीन, तूर आणि कपाशी पिकाला प्राधान्य द्या

जालना। प्रतिनिधी

जालना एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून केरळातच रेंगाळला असून जालना जिल्ह्यावर यंदा पुन्हा एकदा दुष्काळाची गडद छाया निर्माण झाली आहे. जूनचा उत्तरार्ध सुरू झाला तरी पावसाचा पत्ता नाही. आभाळात काळ्या ढगांची गर्दी दूरच, उलट दुपारच्या वेळी आकाश पूर्णपणे निरभ्र राहते. मोजकेच पांढरे ढग इकडेतिकडे फिरताहेत. तापमानही ३८ अंश सेल्सियसच्या आसपास पोहोचल्याने उन्हाच्या तीव्र झळा बसत आहेत, तर वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावाही वेगाने उडून गेला आहे. परिणामी यंदा खरिपाचे गणित पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. जूनच्या शेवटी किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यात दमदार पाऊस झाल्यास ७ जुलैपर्यंत सर्व पिके घेता येतील, तर याहून अधिक पाऊस लांबला तर पीक पॅटर्न बदलावा लागेल असा सल्ला कृषितज्ज्ञांकडून देण्यात आला. दुष्काळप्रवण क्षेत्र असलेल्या जालना जिल्ह्यात १६ जूनपर्यंत ७०.७ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ १९.२ मिमी पाऊस झाला आहे. पावसाची उमेद कायम ठेवत शेतकरी खरीप पूर्व मशागत करत आहेत. कापूस, सोयाबीन पिकाचे क्षेत्र तब्बल ७८ टक्के सोयाबीनची पेरणी १५ जुलैपर्यंत शक्य असून यासाठी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीचे एमएयूएस ६१२, ७२५, ७३१, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे फुले दूर्वा, फुले किमया आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे पीडीकेव्ही अंबा हे सुधारित वाण वापरावेत. तुरीसाठी १५० ते १६५ दिवसांत येणारे बीडीएन ७११ किंवा गोदावरी हे वाण निवडावे. गोदावरीसाठी फुले व शेंगा भरण्याच्या अवस्थेत एक पाणी द्यावे लागते, त्यामुळे सिंचनाची सोय करून ठेवावी, वेळेत पाणी देता येईल. डॉ. श्रीकृष्ण सोनुने, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, केव्हीके, खरपुडी (जालना) बदलते हवामान आणि वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आयएमडी, कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे नियमित पालन करावे.

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

शुक्रवार दि.१९ जून २०२६ | ६

# गेवराईतील वाळू घोटाळा : तहसीलदारांसह प्रमुख सूत्रधारांवर गुन्हे दाखल करा

## एसआयटी चौकशीचीही मागणी ; गेवराईतील सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक प्रकरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले असून, गोदावरी बचाव सर्व पक्षीय कृती समिती, यांनी जिल्हाधिकाऱ्यांची गुरुवारी भेट घेत निवेदन सादर करत या प्रकरणातील प्रमुख आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, या निवेदनात तहसीलदार संदीप खोमणे यांना मुख्य आरोपी घोषित करून त्यांच्यावर शंभर कोटी रुपयांच्या महसूल घोटाळ्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यात परवाना नसताना मोठ्या प्रमाणावर वाळू उत्खनन व वाहतूक करण्यात आली. या अवैध प्रकारामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला असून, संबंधित यंत्रणांनी वेळेवर कारवाई न केल्याने हा प्रकार अधिक बळावल्याचा आरोप गोदावरी बचाव सर्व पक्षीय कृती समितीने केला आहे. अवैध वाळू उत्खनन, वाहतूक आणि साठवणूक याबाबत वारंवार तक्रारी होऊनही संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी ठोस कारवाई केली नाही. उलट काही अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळेच हा घोटाळा वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे तहसीलदार संदीप खोमणे यांच्यावर मुख्य सूत्रधार म्हणून गुन्हा दाखल करा,तसेच



चकलंबा पोलीस स्वतः यात हस्ता घेत असल्याने आणी त्याचा पोलीस कर्मचारी सध्या या गुन्हात आरोपी असल्यामुळे हा तपास चकलंबा पोलीस कडून काढण्यात यावा आणी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी एसआयटी किंवा आर्थिक गुन्हे शाखा मार्फत तपास करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि वाळू माफिया यांच्यातील कथित आर्थिक व्यवहारांचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.विना नंबर हायावा वाहतूकसरास चालू आहे त्यामुळे आर टी ओ जिल्हा ट्राफिक शहर ट्राफिक च्या अधिकारी कर्मचारी वर कारवाई करण्यात यावी या सह

**मोठ्या प्रमाणात महसूल बुडाल्याचा आरोप**

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अवैध वाळू उत्खननामुळे शासनाच्या सुमारे १०० कोटी रुपयांहून अधिक महसुलाचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून नुकसानभरपाई वसूल करावी, अशीही मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्ष,राष्ट्रवादी शरद पवार पक्ष,शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष,शिवसेना शिंदे गट, वंचीत बहुजन आघाडी,रिपाई गवई गट,डेमोकोर्टीक पार्टी ऑफ इंडिया,शेतकरी सघटना,छावा संघटना, प्रहार संघटना,पँथर संघ यांच्या गोदावरी बचाव च्या वतीने करण्यात आली आहे. त्याचबरोबर अवैध वाळू वाहतुकीदरम्यान घडलेल्या अपघातांमुळे काही निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याचा मुद्दाही समितीने उपस्थित केला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ महसूल घोटाळा म्हणून न पाहता, सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय म्हणून

◀◀ पान ३ वर

# अवघ्या १२ तासात चोरी गेलेला ट्रॅक्टर हस्तगत ; आरोपी जेरबंद

धारूर । प्रतिनिधी

धारूर पोलीस ठाणे हद्दीतील कासारी (ता.केज) येथून चोरीस गेलेला ट्रॅक्टर अवघ्या १२ तासांच्या आत शोधून काढत धारूर पोलिसांनी आरोपीसह ट्रॅक्टर ताब्यात घेत गुन्ह्याचा मंगळवारी (दि.१६) छडा लावला आहे.

कासारी येथून ट्रॅक्टर चोरी झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर धारूर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी सोलापूर जिल्ह्यातील




मोहोळ तालुक्यातील पेनूर गाव परिसरात संशयिताचा माग काढला. पोलिसांनी पेनूर येथे जाऊन चोरीस गेलेला ट्रॅक्टर हस्तगत केला, तसेच संबंधित आरोपीस ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपी व ट्रॅक्टरला धारूर पोलीस ठाण्यात आणून पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या कारवाईमुळे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा उघडकीस येऊन प्रकरणाचा छडा लागला आहे. ही उल्लेखनीय कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक श्री व्यंकटराम, धारूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकातील पोलीस हवालदार अमरनाथ घुले आणि पोलीस कॉन्स्टेबल गोविंद खाडे यांनी पार पाडली. त्यांच्या तत्परतेमुळे चोरीस गेलेले वाहन अल्पावधीत हस्तगत करण्यात यश आले असून परिसरातील नागरिकांकडून पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

# मातोश्रीशी गद्दारी करणाऱ्या खासदारांना बीड जिल्ह्यात तुडवणार-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड । प्रतिनीधी

आज दिल्ली येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची संसदीय दलाची बैठक गटनेते खा.अरविंद सावंत यांनी व्हिप बजाऊन बोलावली होती. सदरील बैठकीस हे गद्दार खासदार हजेरी लावतात का नाही याची प्रतिक्षा बीड जिल्हा शिवसैनिक करीत होते. ठीक ११.३० वाजेपर्यंत सदर बैठकीत गद्दार सहा खासदारांपैकी एकही खासदार उपस्थित नसल्याचे समजताच शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात व बीड तालुकाप्रमुख गोरख आण्णा शिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान



जगताप, शिवसहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव सर, युवासेना तालुकाप्रमुख बारीकराव येवले यांच्या प्रमुख उपस्थितीत या गद्दार सहा खासदारांचे प्रतिकात्मक दहन करून त्यांचा जोरदार निषेध नोंदवण्यात आला.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर म्हणाले की,'' ज्या विश्वासाने व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या विचारांशी बांधिल राहुन तसेच हजारो शिवसैनिकांच्या मेहनतीच्या बळावर व लाखो जनतेच्या मतदानरूपी आशिर्वादावर हे सहा गद्दार निवडुन गेले होते. या सर्वांशी त्यांनी आज घात केला आहे. भविष्यात मतदार जनता यांना माफ करणार नाही. या सहा खासदारांपैकी जो गद्दार बीड जिल्ह्यात दिसेल त्याला आम्ही तुडवल्या शिवाय राहणार नाही.'' यावेळी शिवसेना जिंदाबाद, बाळासाहेब ठाकरेंचा विजय असो, उद्धवसाहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, जय भवानी जय शिवराय, अशा गगनभेदी घोषणांनी परीसर दणानुन

◀◀ पान ३ वर

# आ.सोळंके यांची चव्हाण कुटुंबीयांशी सांत्वन भेट

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहरातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व असलेले प्रभाकर (बाबा) दशरथ चव्हाण यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चव्हाण कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

या दुःखद प्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांनी चव्हाण कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी चव्हाण कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचे सांगत प्रभाकर बाबांच्या आठवणींना उजाळा दिला.प्रभाकर बाबा चव्हाण यांच्या सामाजिक, कौटुंबिक आणि आपुलकीच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



याप्रसंगी माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज, धारूर नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसाठ यांच्यासह नगर परिषदेतील गटनेते व नगरसेवक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही चव्हाण कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या.

# जि.प.कर्मचारी पतसंस्थेच्या सचिवपदी सुधीर ठोंबरे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सचिव पदाची निवडणूक १८ जून रोजी पार पडली. या पदासाठी मतदान होऊन सुधीर ठोंबरे यांना १३ पैकी आठ मते मिळाली व त्यांची सचिव पदी निवड झाली.



यापूर्वी कार्यरत असलेले पतसंस्थेचे सचिव सुभाष राऊत ३० मे रोजी सेवानिवृत्त झाल्याने नवीन सचिव पदाची निवड होणे क्रमप्राप्त होते. पतसंस्थेच्या कार्यालयात १८ जून रोजी सचिव पदाच्या निवडीसाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत पतसंस्थेच्या १५ संचालकापैकी १३ संचालक उपस्थित होते. सचिव पदासाठी जिल्हा परिषद वित्त विभागाचे सहाय्यक लेखा अधिकारी सुधीर ठोंबरे व सामान्य प्रशासन विभागाचे कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी संतोष

◀◀ पान ३ वर

# जुन महिन्यातही सकाळ पासूनच कडक उन्हाचा चटका

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मृग नक्षत्र सुरू होऊन एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधी उलटला तरी जिल्ह्यात मान्सूनचे आगमन झाले नाही. त्यामुळे शहरासह परिसरात सकाळ पासून कडक उन्हाचा चटका आणि प्रचंड उकाडा जाणवत आहे. नागरिकांना मे महिन्यासारख्या तीव्र उन्हाच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.



दरवर्षी साधारणपणे मे महिन्यातच वळवाचा, मोठा पाऊस होतो. ०७ जूनपासून मान्सूनचे आगमन होते. त्यानंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन वातावरणातील उकाडा कमी होतो व पारा कमी होतो. मात्र, यंदा जूनचा पहिला पंधरवडा संपला तरी पावसाची प्रतीक्षा कायम आहे. आकाशात अधून मधून ढगांची वर्दळ दिसून येते.मात्र,पावसाचे चिन्ह नसल्याने उष्णतेची तीव्रता कायम असून जिल्हाभरात अजूनही मे महिन्याप्रमाणेच उन्हाचा चटका आणि उकाडा जाणवत आहे. अचानक

◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये शिवदुर्गा-शिवसंवाद दौऱ्याअंतर्गत महिला आघाडीची बैठक उत्साहात संपन्न!

बीड । प्रतिनिधी

शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि शिवसेनेचे संसदीय गटनेते मा. ना. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे साहेब यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली राज्यभर सुरू असलेल्या शिवदुर्गा - शिवसंवाद दौऱ्या अंतर्गत काल दि. १८ जून २०२६ रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना




जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नियोजनाखाली बीड-माजलगाव विधानसभा मतदारसंघातील महिला आघाडीची भव्य व उत्स्फूर्त बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.


या बैठकीस राष्ट्रीय सचिव श्रीमती शायना ताई एन.सी., उपनेत्या श्रीमती विजया पोटे , श्रीमती संगीता ठोंबरे ताई, श्रीमती कला शिंदे ताई, शिवसेना जिल्हाप्रमुख

# पाटोदा-मांजरसुंबा रोडवरील येवलवाडी फाट्याजवळ तात्काळ सरक्षण भिंत उभारण्याची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा-मांजरसुंबा रोडवरील येवलवाडी फाट्याजवळ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या विहिरींमुळे वाहनचालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यालगत असलेल्या या विहिरींना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी, पावसाळ्यात तसेच धुक्याच्या वातावरणात वाहनचालकांना या विहिरींचा अंदाज येत नसल्याने गंभीर





दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिक व प्रवाशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेऊन विहिरींभोवती मजबूत कटाळे (संरक्षण भिंत) अथवा सुरक्षा कठडे उभारावेत, अशी मागणी केली आहे. भविष्यात कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करून प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत, दुर्घटना घडण्याची वाट न पाहता संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करून रस्त्यालगतच्या विहिरी सुरक्षित कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# बसवराज पाटील यांच्या विजयासाठी आ. धसांची मतदारसंघात तगडी फिल्डिंग ; ११ मतदान केंद्रांवर ठेवले बारकाईने लक्ष

आष्टी । प्रतिनिधी

लातूरबीडधाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांच्या विजयासाठी लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांनी संपूर्ण मतदारसंघात तगडी फिल्डिंग लावत निवडणुकीची सूत्रे प्रभावीपणे हाताळली. प्रचारापासून मतदान प्रक्रियेपर्यंत त्यांनी स्वतः लक्ष घालत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये



समन्वय साधला.

निवडणुकीपूर्वी आ. धस यांनी बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यांतील नगरपंचायत, नगरपालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन महायुतीच्या उमेदवारासाठी वातावरणनिर्मिती केली. विविध भागांत प्रचार दौरे काढून लोकप्रतिनिधींशी संवाद साधत बसवराज पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन केले. मतदानाच्या दिवशीही आ. धस यांनी सकाळपासूनच निवडणूक व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित केले. बीड जिल्ह्यातील सर्व ११ मतदान केंद्रांवर त्यांनी बारकाईने नजर ठेवत कार्यकर्त्यांशी सतत संपर्क साधला. आपल्या आष्टी मतदारसंघात सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत शंभर टक्के मतदान पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आष्टी, पाटोदा, बीड, केज, अंबाजोगाई आदी मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन मतदान प्रक्रियेचा आढावा घेतला. भाजप महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्या विजयासाठी आ. सुरेश धस यांनी घेतलेली मेहनत, काटेकोर नियोजन, व्यापक जनसंपर्क आणि मतदान केंद्रांवरील प्रभावी समन्वय यामुळे या निवडणुकीत त्यांची भूमिका विशेष चर्चेचा विषय ठरली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी त्यांनी उभारलेली यंत्रणा आणि दाखविलेली तत्परता राजकीय वर्तुळात कौतुकाचा विषय बनली आहे.

# एनआयएमएच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ.अशोक सानप यांची निवड

बीड । प्रतिनिधी

उमेद अ‍ॅकॅडमी, बार्शी रोड, बीड येथे राष्ट्रीय एकात्मिक वैद्यकीय संघटनेची बैठक पार पडली. यात बीड जिल्हाध्यक्षपदी डॉ. अशोक सानप यांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय एकात्मिक वैद्यकीय संघटना, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सुधाकर मोहिते, डॉ. प्रशांत देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न होऊन यात एन.आय.एम.ए. च्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. अशोक सानप, सचिव डॉ.



धनंजय देशपांडे, कोषाध्यक्ष डॉ. दिनेश तुपे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी डॉ. रमेश घोडके, डॉ. भुजंग थोरात, डॉ. अनिकेत कुलकर्णी, डॉ. लातूरकर, डॉ. राऊत, डॉ. बिर्ला, डॉ. कवडे, डॉ. गुंजाळ, डॉ. राहिंज, डॉ. मोहिते, डॉ. चरखा, डॉ. नहार, डॉ. बेदमुथा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर खाडे यांनी तर प्रस्ताविक डॉ. राजाराम जाधव यांनी केले. शेवटी डॉ. प्रसन्न कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk